७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
गुरुवार, दि. २८ मे २०२६
www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews
संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १५२ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये

# पक्षात कोणताही वाद नाही; राष्ट्रवादी एकसंघ असल्याचा दावा

## देवगिरीवरील बैठकीनंतर अफवांना ऊत; बनसोडेंचं मोठं स्पष्टीकरण

मुंबई (दै. संध्या)



मुंबईतील देवगिरी निवासस्थानी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीनंतर पक्षातील अंतर्गत मतभेदांच्या चर्चांना मोठं उधाण आलं होतं. मात्र या सर्व चर्चांवर आता राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संजय बनसोडे यांनी प्रतिक्रिया देत स्पष्ट शब्दांत पक्षात कोणताही वाद नसल्याचा दावा केला आहे. माध्यमांमध्ये सुरू असलेल्या वादाच्या बातम्या पूर्णपणे निराधार असून पक्ष सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली एकसंघपणे काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

संजय बनसोडे यांनी म्हटलं की, 26 मे रोजी झालेल्या बैठकीत पक्षाच्या सर्व आजी-माजी खासदार, आमदार आणि पदाधिकाऱ्यांनी सहभाग घेतला होता. या बैठकीत एकमताने ठराव मंजूर करण्यात आला असून आगामी काळात राष्ट्रवादी काँग्रेस अधिक मजबूत करण्याचा निर्धार करण्यात आला. सुनेत्रा पवार जो निर्णय घेतील, त्यामागे सर्व नेते आणि पदाधिकारी ठामपणे उभे राहतील, अशी ग्वाही बैठकीत देण्यात आल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. पक्ष बळकटीसाठी सर्वजण एकत्रितपणे कार्यरत राहणार असल्याचं बनसोडेंनी सांगितलं.

दरम्यान, बैठकीदरम्यान सुनील तटकरे यांनी त्यांच्यावर आणि प्रफुल पटेल यांच्यावर सातत्याने होत असलेल्या टीकेबाबत नाराजी व्यक्त केल्याची माहिती समोर आली होती. पक्षातील कुणीही आमच्या समर्थनासाठी पुढे येत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. तसेच प्रत्येक वेळी टीकेचे धनी आम्हीच का व्हायचं, यावर वरिष्ठ नेतृत्व भूमिका घेणार का? असा सवालही त्यांनी उपस्थित केल्याची चर्चा रंगली. विशेष म्हणजे प्रफुल पटेल मुंबईत उपस्थित असूनही बैठकीला गैरहजर राहिल्याने त्यांच्या नाराजीच्या चर्चांना आणखी हवा मिळाली. सूत्रांच्या माहितीनुसार, बैठकीत सुनील तटकरे बोलत असताना मंत्री छगन भुजबळ यांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा आहे. मात्र आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी आपण बोलणारच असल्याचं तटकरेंनी सांगितल्याचं बोललं जात आहे. दुसरीकडे, सुनील तटकरेंच्या भाषणापूर्वीच पार्थ पवार बैठकीतून बाहेर पडल्याची माहितीही समोर आली. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर्गत मतभेद वाढल्याच्या चर्चांना अधिक जोर आला आहे.

### पक्ष पूर्णपणे एकसंध

मात्र या सर्व चर्चांवर पडदा टाकण्याचा प्रयत्न आता पक्षाकडून केला जात आहे. संजय बनसोडे यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केलं की, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कोणताही अंतर्गत संघर्ष नाही. पक्ष पूर्णपणे एकसंध असून सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली आगामी राजकीय वाटचाल अधिक ताकदीने केली जाणार आहे. तसेच छगन भुजबळ यांनीदेखील सुनील तटकरे आणि आपल्यात कोणताही वाद नसल्याचं स्पष्ट करत अफवा न पसरवण्याचं आवाहन केलं आहे.

# विधानपरिषदेचा तिढा मुंबईतच सुटणार, दोन जागांवरुन अडलंय

मुंबई (दै. संध्या)



राज्याचं लक्ष लागलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विधानपरिषद निवडणुकांच्या 17 जागांसाठी महायुतीमधील जागावाटपाचा तिढा जवळपास सुटला असून, केवळ दोन ते तीन जागांवर अंतिम निर्णय होणे बाकी असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या जागांवर शिवसेनेसोबत (शिंदे गट), तर पुण्याच्या जागेवरून राष्ट्रवादी काँग्रेससोबत भाजपची सध्या सकारात्मक चर्चा सुरू आहे. मित्रपक्षांचे नेते एकत्र बसून यावर अत्यंत सन्मानजनक तोडगा काढतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. राजधानी दिल्लीत केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांच्यासमवेत साखर उद्योगसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर नेत्यांची बैठक होती, त्यासंदर्भाने चर्चा करण्यासाठी आलो होतो, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तसेच, विधानपरिषद निवडणुकांच्या जागेचा तिढा दिल्लीत नाही तर मुंबईत सोडवला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. विधानपरिषदेच्या 17 पैकी 12 जागा भाजप लढवणार असल्याची माहिती असून शिंदेंच्या शिवसेनेला तीन आणि राष्ट्रवादी काँग्रेसला 2 जागा देण्यात येणार असल्याची चर्चा आहे. त्याच पार्श्वभूमीवर आज तिन्ही पक्षाचे प्रमुख दिल्लीत होते. त्याच अनुषंगाने महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांसोबत बैठकीत चर्चा झाल्याची माहिती आहे. देवेंद्र फडणवीस यांनीही या बैठकीनंतर माहिती दिली. विधानपरिषद निवडणुकीबाबत मी पुन्हा सांगतो, आमचं जवळपास ॲग्रीमेंट झालेलं आहे, फक्त शिवसेनेसोबत नाशिक आणि संभाजीनगर येथील जागा आम्हाला मिळाली पाहिजे हा आमचा आग्रह आहे. राष्ट्रवादीने आमच्याकडे पुण्याची जागा मागितलेली आहे, सध्या याच गोष्टींवर आमचं अडलं आहे जे आम्ही सोडवून घेऊ, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषद निवडणुकांवर भाष्य केलं. कठीण पेपर संपलाय, आता सोपा पेपरही आम्ही सोडवून घेऊ, टीकमार्क करायचं बाकी आहे, ते होऊन जाईल.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# मी कोणताही चुकीचा शब्द वापरला नाही

## हर्षवर्धन सपकाळांचे स्पष्टीकरण

मुंबई (दै. संध्या)



सध्या जी देशात आणि राज्यात परिस्थिती पाहायला मिळत आहे, यावरून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. महाविकास आघाडीने काल कांद्याच्या प्रश्नी तीन तास रस्ता जाम केला होता. तसेच महागाईवरून देखील विरोधकांनी हल्लाबोल सुरू केला आहे. कालच्या आंदोलनावेळी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पंतप्रधान तसेच मुख्यमंत्र्यांविषयी अपशब्दांचा वापर केला होता. यावर आज पत्रकार परिषदेत स्पष्टीकरण देत पुन्हा जोरदार टीका केली आहे. पत्रकार परिषदेत बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, काल कांदा प्रश्नी तीन तास रस्ता जाम केला आम्ही. त्यात रोहित दादा होते, शशिकांत शिंदे होते, अंबादास दानवे होते तसेच इतर मित्र पक्ष होते. रस्ता जाम केला, लोक रस्त्यावर उतरले होते. याचा परिणाम म्हणजे आज सरकारच्या अर्थमंत्रिमंडळाला दिल्लीला जावे लागले आहे. हे अर्थ मंत्रिमंडळ दिल्लीला गेले असले तरी हात हलवत परत येऊ नका हा आमचा त्यांना सज्जड दम आहे. मी कोणताही चुकीचा शब्द वापरलेला नाही पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी महायुती सरकारवर टीका करताना म्हटले की, हे गँग ऑफ ट्रिपल इंजिन सरकार आहे. त्यांच्यामध्ये टोळी युद्ध सुरू झाले आहे. सत्तापिपासू लोक आहेत, त्यांचा हा फक्त सत्ता मिळवण्यासाठी खेळ सुरू आहे. तसेच हर्षवर्धन सपकाळ यांनी काल भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविषयी बोलताना अपशब्दांचा वापर केला होता. त्यावर स्पष्टीकरण देताना ते म्हणाले, मी कोणताही चुकीचा शब्द वापरलेला नाही. 'दलिंदर' हा जो शब्द आहे हा कॅरेक्टर दाखवणारा, लक्षण दाखवणारा शब्द आहे. दरिद्री या संस्कृत शब्दातून तो शब्द आलेला आहे.

# मला फोनवरुन धमक्या, रुपाली चाकणकरांचा रोल करू नका

## अभिनेत्री दिपाली सय्यद यांचा खळबळजनक दावा

मुंबई (दै. संध्या)



नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात लैंगिक अत्याचारप्रकरण आता 70 मिमि पडद्यावर झळकणार आहे. लवकरच या चित्रपटाचे शुटींग सुरू होणार असून चित्रपटात अभिनेत्री दीपाली सय्यद यांची महत्त्वाची भूमिका असणार आहे. मात्र, दीपाली सय्यद यांनी चित्रपटात काम करू नये, रुपाली चाकणकर यांची भूमिका साकारू नये, असे म्हणत दीपाली यांना धमक्या येत असल्याचा खळबळजनक दावाच त्यांनी केला आहे. अशोक खरात प्रकरणावर चित्रपट येत असताना आणि रोल करत असताना कोणीही कलाकाराला दबावात आणू नये. मला काही धमक्यांचे फोन येत आहेत, पण कर नाही त्याला डर कशाचा? हे माझं प्रोफेशन आहे आणि हे न करण्यासाठी जर मला फोन येत असतील तर हे चुकीचं आहे, असे शिवसेनेतील नेत्या तथा अभिनेत्री दिपाली सय्यद यांनी म्हटले.

दिग्दर्शक स्वरूप बी सावंत यांचा महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स नावाने अशोक खरातच्या काळ्या कृत्यावर आधारित सिनेमा लवकरच येत आहे. त्याच अनुषंगाने अभिनेत्री दीपाली सय्यद यांनी संवाद साधला. त्यावेळी, आपल्याला फोनवरुन धमक्या येत असल्याचंही त्यांनी म्हटलं. खरात प्रकरणावरचा चित्रपट करू नका, हा रोल करू नका, असे म्हणत काहीजण थोडंस थांबायला सांगत आहेत. मला राजकीय प्रेशर दिलं जातय, तुमचं राजकीय करिअर उद्ध्वस्त करतील असा मला महिला नेत्यांचा फोन आला होता, असे दिपाली सय्यद यांनी म्हटलं.

मला तुम्ही फोन का करताय? राजकीय महिला नेत्या आहेत, त्यांचा रोल मी करते. मी या प्रेशरला घाबरत नाही आणि मी काम करणार आहे. मी माझ्या पक्षश्रेष्ठींशी बोलणार आहे, मी एकनाथ शिंदे, श्रीकांत शिंदे यांच्याशी या सगळ्या संदर्भात बोलेन. मी त्यांच्यासमोर हे ओपन करणार आहे की मला या या लोकांचे फोन येत आहेत, असेही दिपाली सय्यद यांनी म्हटलं. मी कलाकार आहे, कोणाची परमिशन घेऊन काम करत नाही. दोन-तीन दिवसांपूर्वीच या सगळ्या चित्रपटा संदर्भात चर्चा सुरू झाली. कालच मला 'महाराष्ट्र एफस्टीन फाईल'ची स्क्रिप्ट मिळाली. स्क्रिप्ट वाचल्यानंतर मला कळालं हे असं सगळं प्रकरण आहे. चार महिने मी बिग बॉसमध्ये होते, त्याच्यामुळे या सगळ्या प्रकरणात काय झालं? हे मला माहित नव्हतं, पण बाहेर आल्यानंतर कळलं आहे, असेही दिपाली यांनी म्हटलं.

मोठ मोठी लोक या सगळ्या खरात प्रकरणामध्ये सहभागी आहेत आणि त्यामुळे अशी प्रकरण थांबली पाहिजे. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यामध्ये एक लाईन असते ती आपल्याला माहिती असली पाहिजे. आपण किती लोकांवर श्रद्धा आणि अंधश्रद्धा ठेवली पाहिजे, हे लोकांना कळलं पाहिजे. मी रोल तुम्हाला कन्फर्म सांगत नाही आणि मी कोणाशीही या रोल संदर्भात चर्चा करणार नाही. 2 ऑक्टोबरला चित्रपट रिलीज होणार आहे आणि पुढच्या महिन्यात शुटिंग सुरू होईल, त्याच्यामुळे कुठला रोल मी करते हे तुम्हाला कळेलच, असे म्हणत दिपीली सय्यद यांनी चित्रपटातील आपला रोल गुपित ठेवला आहे. अशोक खरात कुठल्या बाबतीतले गुरु होते हे तुम्हाला कळलं पाहिजे होतं, आकडा ते सांगायचे. तुम्हाला काहीतरी करायला सांगायचे, तुम्हाला काहीतरी प्यायला द्यायचे, हे असे प्यायला वगैरे देणारे गुरु कसे असू शकतात. रूपाली चाकणकरांची चूक आहे की नाही हे स्क्रिप्ट पूर्णपणे वाचल्यानंतर मला कळेल, असेही दिपाली सय्यद यांनी स्पष्ट केले. दरम्यान, 'आता सगळं उघड होणार...!' हि टॅगलाईन हा चित्रपट अनेकांचा पर्दाफाश करणार असल्याचे संकेत देण्यासाठी पुरेशी आहे. आता हा चित्रपट कोणकोणत्या गोष्टी उघड करतो, ते प्रदर्शनानंतरच समजेल. या चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर अनेकांचे सभ्यतेचे मुखवटे आपोआप गळून पडणार आहेत.

### ढिंग-टांग




# 'इंडियन ऑयल'च्या सीएसआर उपक्रमातून कूपर रुग्णालयास बायोकेमिस्ट्री ब्लड ॲनालायझर

## आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यास शासनाचे प्राधान्य : मुख्यमंत्री

मुंबई (दै. संध्या)



आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना अधिक जलद, अचूक आणि दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी 'इंडियन ऑयल कॉर्पोरेशन लिमिटेड' (आयओसीएल) च्या कार्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत जुहू येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालय व डॉ. आर. एन. कूपर महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयात पूर्णपणे स्वयंचलित अत्याधुनिक बायोकेमिस्ट्री ब्लड ॲनालायझर उपलब्ध करून देण्यात आला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी याबाबत सांगितले आहे की, राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यास शासनाचे प्राधान्य आहे. कार्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमाच्या माध्यमातून सार्वजनिक रुग्णालयांना अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांची जोड मिळत असल्याने आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम होत आहे. यामुळे रुग्णांना जलद आणि अचूक सेवा देण्यास मदत होईल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे आधुनिकीकरण वेगाने सुरू असून, हा उपक्रम त्याच दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या अत्याधुनिक यंत्रणेमुळे रुग्णालयाच्या निदान क्षमतेत मोठी वाढ होणार आहे. मोठ्याप्रमाणात रक्त तपासण्या अधिक वेगाने आणि अचूकपणे करता येणार आहेत. नियमित तसेच तातडीच्या बायोकेमिकल चाचण्या कमी वेळेत पूर्ण होणार असल्याने डॉक्टरांना त्वरित वैद्यकीय निर्णय घेणे अधिक सुलभ होणार आहे. परिणामी, रुग्णांना उपचार लवकर सुरू करण्यास मदत मिळणार असून आरोग्यसेवेची गुणवत्ता उंचावणार आहे.

मुंबईच्या पश्चिम उपनगरांतील हजारो रुग्णांसाठी डॉ. आर. एन. कूपर रुग्णालय हे महत्त्वाचे सार्वजनिक आरोग्य केंद्र मानले जाते. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील नागरिक मोठ्या प्रमाणावर या रुग्णालयावर अवलंबून आहेत. अशा परिस्थितीत अत्याधुनिक बायोकेमिस्ट्री ब्लड ॲनालायझरची उपलब्धता ही सार्वजनिक आरोग्यसेवेला मोठा आधार ठरणार आहे. या उपक्रमामुळे प्रयोगशाळेतील कार्यपद्धती अधिक कार्यक्षम होणार असून अहवालांचा 'टर्नअराउंड टाइम' लक्षणीयरीत्या कमी होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नमुन्यांचे विश्लेषण अधिक अचूकपणे करता येणार असल्याने उपचार प्रक्रियेलाही गती मिळणार आहे.

इंडियन ऑईल कार्पोरेशन लिमिटेड या कंपनीच्या कार्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमाच्या माध्यमातून आरोग्य क्षेत्रात सातत्याने करण्यात येणाऱ्या उपक्रमांमुळे सार्वजनिक आरोग्य संस्थांची क्षमता वाढत असून, नागरिकांना अधिक सक्षम व विश्वासार्ह वैद्यकीय सेवा उपलब्ध होत आहे.

# महाविकास आघाडी सर्व जागा लढवणार

## जागावाटपही जवळपास निश्चित



मुंबई (दै. संध्या)

विधान परिषदेच्या 17 जागांसाठी महायुतीत रस्सीखेच सुरू असतानाच महाविकास आघाडीनेही आता या निवडणुकीसाठी कंबर कसल्याचं दिसून येतंय. महाविकास आघाडी विधान परिषदेच्या सर्व म्हणजे 17 जागा लढवणार आहे. त्यामध्ये काँग्रेस सर्वाधिक जागा लढवणार असून त्याखालोखाल ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी जागा लढवणार आहे. येत्या 18 जून रोजी विधान परिषदेच्या 17 जागांसाठी निवडणूक पार पडणार आहे.

या 17 जागांपैकी काँग्रेस सात ते आठ जागा लढणार आहे. तर ठाकरेंची शिवसेना पाच ते सहा जागा लढणार आहे. त्याचवेळी शरद पवारांची राष्ट्रवादी तीन ते चार जागांवर लढणार असल्याची माहिती आहे. कोण कुठल्या जागांवर लढणार याविषयीचा निर्णय येत्या दोन ते तीन दिवसांत घेतला जाणार असल्याची माहिती आहे. 26 तारखेला मविआ नेत्यांची पुन्हा बैठक होणार असून त्यावेळी अंतिम चित्र स्पष्ट होईल.

दरम्यान, महायुतीतल्या नाराजीचा फायदा उठविण्याचा महाविकास आघाडीचा प्रयत्न आहे. त्यामुळे महाविकास आघाडीकडून सर्व जागा लढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विधान परिषदेच्या 17 जागांसाठी महाविकास आघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्युला अद्याप निश्चित झाला नसला तरी ज्या ठिकाणी ज्या पक्षाची ताकद आहे तो ती लढवेल अशी माहिती आहे. त्यानुसार चंद्रपूर, सांगली-सातारा या ठिकाणी काँग्रेसची ताकद आहे. तर परभणी हिंगोलीमध्ये शिवसेनेची ताकद आहे. त्यानुसार जागावाटप होणार असल्याची माहिती आहे.

2022 मध्ये भाजपसोबत एकत्र येत शिंदेंनी सरकार स्थापन केलं. पुढे 2023 मध्ये अजित पवारांची राष्ट्रवादीही या सरकारमध्ये सामील झाली. त्यानंतर 2024 च्या विधानसभा निवडणुकीत या महायुतीला प्रचंड बहुमतही मिळालं. मात्र, निवडणूक कोणतीही असो या महायुतीतील तिन्ही पक्षांमध्ये जागावाटपासाठी होणारी रस्सीखेच आणि त्यानंतर होणारी दिल्लीवारी हे समीकरण पक्कं झालं.

आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषदेच्या 17 जागांसाठी निवडणूक होत आहे. या निवडणुकीतील जागावाटपावरुन महायुतीत जोरदार रस्सीखेच सुरू आहे. त्यामुळे या जागावाटपाचा तिढाही आता दिल्ली दरबारी गेला आहे.

### निवडणूक कार्यक्रम जाहीर

अधिसूचना जारी : 25 मे
अर्ज भरण्याची शेवटची तारीख : 1 जून
अर्जाची छाननी : 2 जून
अर्ज माघारीची शेवटची तारीख : 4 जून
मतदान : 18 जून - स. 8 ते दु. 4.
मतमोजणी : 22 जून

# संपादकीय

## अश्रू आणि नक्राश्रू

चिरणाऱ्याच्या डोळ्यांतून पाणी काढण्याचा गुणधर्म असलेल्या कांद्याने यंदा पुन्हा उत्पादकाच्याच डोळ्यात पाणी आणले आहे. कधी दर गगनाला भिडल्याने ग्राहकाला, तर कधी मातीमोल झाल्याने शेतकऱ्याला रडविण्याचा रिवाज सालाबादप्रमाणे कांद्याने चालू हंगामातही कायम ठेवला आहे. अर्थात, त्यात दोष कांद्याचा नाही. दोष आहे तो यंत्रणेच्या नियोजनशून्यतेचा आणि सरकारच्या बधिरतेचा. सध्या कांद्याचे भाव कोसळल्याने महाराष्ट्राच्या कांदा उत्पादक पट्ट्यातील शेतकरी रस्त्यावर आले आहेत आणि त्यांच्यातील असंतोषाला खतपाणी घालण्यासाठी विरोधी नेतेही सरसावले आहेत. त्यामुळे लिलाव बंद, रास्ता रोकोसारखी आंदोलने ठिकठिकाणी सुरू आहेत. आपल्याकडे कांद्याचा प्रश्न आता केवळ शेतीमालाच्या भावाचा विषय राहिलेला नाही, तर तो सरकारच्या असंवेदनशीलतेचा, धोरणात्मक अपयशाचा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या गळचेपीचा प्रतीक बनला आहे. वास्तविक गेल्या महिनाभरापासून कांदाभावाची ओरड सुरू होती. इराण-अमेरिका युद्धाने आखातातील कांदा निर्यातीवर विपरीत परिणाम झाला आहे. शिवाय, आपल्या कांद्याचा मोठा आयातदार असणाऱ्या बांगलादेशात गतवर्षी उत्पादनाच्या जवळपास चाळीस टक्के कांदा पाठवला गेला होता; पण यंदा मात्र जेमतेम सात टक्केही कांदा तिथे गेलेला नाही. कारण, तिथल्या स्थानिक बाजारात यावेळी कांदा मुबलक आहे. दुसरीकडे महाराष्ट्रासह अन्य राज्यांतील उन्हाळ कांदा देशांतर्गत बाजारात प्रचंड प्रमाणावर येत असल्याने भाव एवढे पडले आहेत की शेतकऱ्यांचा वाहतूक खर्चही निघेनासा झाला आहे. विशेष म्हणजे, हा सगळा उद्रेक अचानक झालेला नाही. गेल्या अनेक दिवसांपासून बाजार समित्या, शेतकरी, त्यांच्या संघटना सातत्याने इशारे देत होत्या. उत्पादन वाढले आहे, निर्यात धोरण स्पष्ट नाही, साठवणूक क्षमता अपुरी आहे, केंद्र सरकारचे निर्णय विसंगत आहेत वगैरे. पण सरकारने नेहमीप्रमाणे वेळ मारून नेण्याचे धोरण स्वीकारले. ग्राहकांना स्वस्त कांदा मिळावा यासाठी सरकार झटते, पण तोच कांदा पिकवणारा शेतकरीही जगला पाहिजे याची जबाबदारी घ्यायला कुणीच तयार नाही. शहरी मतदार नाराज होऊ नये म्हणून निर्यातबंदी, स्टॉक लिमिट, बाजार हस्तक्षेपाव्दारे दर नियंत्रणाची लगबग सुरू होते. पण त्याचा थेट फटका शेतकऱ्याला बसतो. एका बाजूला शेतकरी हिताची भाषा आणि दुसऱ्या बाजूला बाजार हस्तक्षेप करून भाव पाडण्याचे राजकारण, हा दुटप्पीपणा वारंवार उघड झाला आहे. हमीभावाचा विषय असो की निर्यातीची धरसोड वृत्ती, याबाबत सरकारकडे दीर्घकालीन धोरणच नाही. त्यामुळे दरवेळी कांदा दराचे तेच चक्र, यंत्रणेच्या त्याच चुका, तीच उदासीनता आणि तीच तात्पुरती मलमपट्टी हे ठरलेले आहे. शेतकरी कांदा लावतो, त्यासाठी राबराब राबतो, कर्ज काढतो, पाणी, मजुरी, खत, औषधे यावर हजारो रुपये खर्च करतो. पण शेवटी बाजारात त्याच्या कांद्याला मिळणारा भाव कवडीमोल असतो. यावेळी तर अक्षरश: रुपया, दोन रुपयांपर्यंत प्रतिकिलो दराची झालेली घसरण म्हणजे शेतकऱ्यांची क्रूर थट्टाच आहे. या उद्रेकातूनच मग रास्ता रोको, रेल रोकोसारख्या मार्गांतून सरकारी बधतरतेला खरवडण्याचा प्रयत्न जनआंदोलनांच्या रूपाने केला जातो. कांद्याचे दर हा देशभरातील नागिरकांच्या दृष्टीने संवेदनशील, तर उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने जीवन-मरणाचा प्रश्न आहे. विशेषत: कांदा महाराष्ट्राच्या अर्थकारणात अत्यंत महत्त्वाचा आहे. नाशिकसह अहिल्यानगर, पुणे, सोलापूर पट्ट्यातील लाखो कुटुंब थेट किंवा अप्रत्यक्षपणे त्यावर अवलंबून आहेत. तरीही प्रक्रिया उद्योग, निर्यात साखळी, आधुनिक साठवणूक व्यवस्था, बाजारपेठ विस्तार या बाबतीत ठोस काम झाल्याचे दिसत नाही. कांद्याचे भाव वाढले तर सरकार घाबरून हस्तक्षेप करते व भाव नियंत्रणात आणले जातात आणि भाव पडले तर सरकार मूग गिळून बसते. म्हणजे शेतकरी कोणत्याही परिस्थितीत भरडलाच जातो. आज कांदा उत्पादकांच्या झालेल्या कोंडीमुळे परिस्थिती एवढी चिघळली आहे की शेतकरी संघटनांच्या जोडीला विरोधी पक्षही एकवटले आहेत.

## संस्कृत सुभाषित

जीर्णभोजिनं व्याधिर्नोपसर्पति ॥

अर्थ – आधीचे भोजन नीट पचल्यानंतरच नंतरचे भोजन सेवन करणारा जो असेल, त्याच्या जवळपास व्याधी फिरकत नाहीत.

## गुरु वचन



### यशाच्या गमकासाठी

यश प्राप्त करण्यासाठी नियम, सिद्धातांना प्रत्यक्षात व्यवहार आणण्याची आवश्यकता आहे. मात्र, बऱ्याचशा व्यक्ती नियम आणि व्यवहार यांची सांगड घालताना टाळाटाळ करताना दिसतात. शिक्षण खूप सारी जमीन काबीज करते; पण त्या जमिनीवर कधी शेती करत नाही. दुर्देवाने पुष्कळ व्यक्ती धन संपत्ती खर्च करून शिक्षण घेतात. पण एखादी छोटी–मोठी नोकरी मिळताच आपली योग्यता दाबून ठेवून आहे त्या नोकरीतच हात पाय पसरतात. आपण आपली योग्यता खुंटीला टांगून ठेवतो आणि तकलादू कार्य करण्यात आयुष्य घालवतो. ऑफिसमध्ये टांगण्यात आलेल्या घड्याळ्याकडे याकरिता बघितले जाते की अजून घरी जायला किती वेळ बाकी आहे, हे दुर्देवी सत्य आहे. जगातला सर्वात महत्त्वपूर्ण नियम, सिध्दांत तोपर्यंत पूर्ण होऊ शकणार नाही जोपर्यंत आपण त्याचे नाते व्यवहारांशी जोडू शकत नाही.

## सुविचार

निसर्ग हा त्याच्या नैसर्गिक प्रव्रुत्तिनुसार अत्यंत पाशवी आणि विषम आहे; आणि मानवाने या ना त्या मार्गाने निसर्गाच्या पाशवीपणा व विषमतेच्या केवळ स्वरुपात बदल करण्यात यश मिळवले आहे.

– केदार जोशी

## उपदेशकथा

स्वामी विवेकानंदांचे लहानपणीचे नाव होते नरेंद्र. त्यांची त्यावेळची ही गोष्ट. नरेंद्राच्या वर्गावर एक शिक्षक भूगोलाचा तास घेत होते. त्यांनी खिळ्याला बंगालचा नकाशा टांगला होता आणि त्यावरून ते माहिती सांगत होते. अधूनमधून प्रश्नही विचारत होते. नरेंद्राची पाळी आल्यावर त्यांनी त्याला एका गावाविषयी प्रश्न विचारला. नरेंद्राने बरोबर उत्तर दिले पण गुरुजींचा काहीतरी गैरसमज झाला आणि त्यांना ते उत्तर चूक वाटून ते नरेंद्राला टाकून बोलले. नरेंद्राला ते बोलणे अपमानास्पद वाटले आणि तो जरा जोरात म्हणाला, 'गुरुजी, माझंच म्हणणं बरोबर आहे.' या उलट उत्तराचा गुरुजींना राग आला आणि त्यांनी हातात छडी घेऊन नरेंद्राला मारायला सुरुवात केली. नरेंद्र माझं उत्तर बरोबर आहे, असे म्हटला की ते छडी मारीत, असे सात वेळा झाले. मग मात्र गुरुजी भानावर आले. त्यांनी नकाशाजवळ जाऊन पाहिले आणि नरेंद्राचेच उत्तर बरोबर आहे असे त्यांना आढळले. आपली चूक असतानाही आपण नरेंद्राला मारले याचे त्यांना खूपच वाईट वाटले आणि पश्चात्ताप झाला. आत्मविश्वास आणि खंबीरपणा यामुळे नरेंद्र मात्र सर्वांचा लाडका बनला.

कथा उपदेश : दुसऱ्याची बाजू आपण समजावून घेतली पाहिजे.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:वारीयन |
| २८ मे २०२६ | २७:५४:१२+ |
| गुरुवार | करण:बालव ०७:५७:१५ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:कौलव २०:५२:०७ |
| अधिक ज्येष्ठ शके | सूर्य:वृषभ |
| संवत्– १९४८ | चन्द्र:तुला |
| संवत्सर – पराभवनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – जिल्हेज |
| मास– अधिक ज्येष्ठ | तारीख – ११ |
| ऋतु– सौर ग्रीष्म | विशेष |
| शुक्ल पक्ष | प्रदोष |
| तिथि:द्वादशी ०७:५७:१५ | स्वातंत्र्यवीर |
| नक्षत्र:चित्रा ०८:०८:०७ | सावरकर जयंती |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९६२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 3 | 7 | | | 2 | 5 |
| 2 | 6 | | 9 | 1 | | 8 | 3 | |
| 7 | | | | | 6 | | 9 | |
| 6 | | 4 | | | | 7 | 5 | |
| | | | 2 | | 7 | | | |
| | 7 | 8 | | | | 2 | | 9 |
| | 5 | | 4 | | | | | 6 |
| | 3 | 6 | | 5 | 9 | | 8 | 2 |
| 1 | 9 | | | 6 | 2 | | | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९६१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 1 | 4 | 2 | 5 | 7 | 6 | 3 |
| 3 | 5 | 4 | 1 | 6 | 7 | 9 | 8 | 2 |
| 7 | 2 | 6 | 3 | 8 | 9 | 5 | 4 | 1 |
| 1 | 4 | 3 | 9 | 5 | 8 | 2 | 7 | 6 |
| 9 | 7 | 5 | 2 | 4 | 6 | 1 | 3 | 8 |
| 2 | 6 | 8 | 7 | 1 | 3 | 4 | 9 | 5 |
| 4 | 1 | 7 | 8 | 3 | 2 | 6 | 5 | 9 |
| 5 | 3 | 9 | 6 | 7 | 1 | 8 | 2 | 4 |
| 6 | 8 | 2 | 5 | 9 | 4 | 3 | 1 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८४५ – क्युबेक कॅनडा येथे आगीत १५०० घरे जळून खाक.
- १९७७ – केनटक्की येथे बेवरली हिल्स सप्पर कल्बमध्ये लागलेल्या आगीत १६५ जण ठार.
- १९९५ – रशिया येथे खबरावोस्क शहरात भूकंपाने २००० जण ठार.

### राष्ट्रीय

- १९६३ – बंगालच्या खाडीत मोठ्या वादळाने २२००० ठार.
- १९६५ – धनबादच्या ढोरी खाणात स्फोट; ४०० ठार.
- १९९६ – भारताचा पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचा राजीनामा.
- २००८ – बिहारमधील जलद न्यायालयाने एका हत्या प्रकरणात एकाच कुटुंबातील चार महिलांसह आठ जणांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली.

### जन्म

- १८८३ – स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, भारतीय क्रांतिकारक, प्रभावी वक्ते, मराठी साहित्यिकाचा जन्म.
- १९०३ – शंतनुराव किर्लोस्कर, मराठी उद्योगपतीचा जन्म.
- १९२३ – एन. टी. रामाराव, लोकप्रिय तेलुगू अभिनेता, निर्माता, दिग्दर्शक, आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्रीचा जन्म.

### निधन

- १२५९ – डेनमार्कचे राजा क्रीस्टोफेल पहिला यांचे निधन.
- १९६१ – प. कृ. गोडे, प्राच्यविद्या संशोधकाचे निधन.
- १९९० – मलेशियाचे पहिले पंतप्रधान हुसैन बीन औन यांचे निधन.
- २००८ – ग्रॅड स्लॅम विजेता स्वीडनचा पहिला खेळाडू आणि आंतरराष्ट्रीय टेनिस हॉल ऑफ फेमचे सदस्य स्वेन डेव्हिडसन यांचे निधन.

## : SMS :

Ticket Chacker: Amma karaya poora do.
Amma: Mai student hon
TC: Konse school me?
Amma: Woh q bataoon?

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ४१.१ | २६.४ |
| अहमदनगर | ३९.२ | २५.७ |
| अकोला | ४५.७ | ३२.२ |
| अमरावती | ४४.१ | ३१.७ |
| बीड | ४८.३ | ३६.४ |
| भंडारा | ४६.९ | ३३.९ |
| बुलढाणा | ४० | २७.६ |
| चंद्रपूर | ४८ | ३६.१ |
| चेन्नई | ४८.३ | ३४.८ |
| नवी दिल्ली | ४०.६ | ३०.४ |
| धुळे | ४५.४ | २९.६ |
| गोंदिया | ४४ | ३१.३ |
| जळगाव | ४६.६ | ३०.४ |
| कोल्हापूर | ३६.७ | २५.३ |
| लातूर | ४१ | २९.६ |
| मुंबई | ४१.२ | ३५.८ |
| नागपूर | ४५.३ | ३५ |
| नांदेड | ४४.८ | ३२.१ |
| नंदूरबार | ३९.८ | २७ |
| नाशिक | ३९.१ | २५.७ |
| पुणे | ३६.४ | २४ |
| पंढरपूर | ४१ | २९.५ |
| सातारा | ३८.६ | २४.६ |
| सांगली | ३८.६ | २५.७ |
| सोलापूर | ४०.९ | ३०.४ |
| वर्धा | ४७.१ | ३४.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर
शुभकामाची रूपरेषा आखाल. राजकीय कामात यश मिळण्याचे योग आहेत.

**तूळ :** शुभ रंग :निळा, शुभ दिशा: दक्षिण
जुन्या परिचित व्यक्तिची अचानक भेट होईल. मनोबलात वाढ होईल.

**वृषभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व
जोशपूर्वक कामात रस घ्याल. हुशार व्यक्तिची भेट होईल त्यामुळे फायदा होईल. मन प्रसन्न राहील. आपल्या वस्तू संभाळा.

**वृश्चिक :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:दक्षिण
कामात यश मिळाल्याने आनंदी रहाल. प्रवास फायदेशीर असणार आहे.

**मिथून :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण
सामाजिक कामात यश व सन्मान मिळण्याचे योग आहे. पूर्ण मोबदला मिळेल.

**धनू :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा: पूर्व
कौटुंबिक सदस्याचे आपल्या विषयी मत चांगले राहील. काम करतांना वेळेचे बंधन राखा.

**कर्क :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: उत्तर
मित्रांचे सहकार्य लाभेल. विचारपूर्वक काम केल्याने कामात यश मिळणार आहे. साथीदारांच्या कामावर लक्ष असू द्या.

**मकर :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पूर्व
विशेष काम होण्याचे योग आहेत. साथीदाराचे सहकार्यामुळे मन प्रसन्न राहील. सावधानी बाळगा.


**सिंह :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:उत्तर
मनमानीने काम करण्याची प्रवृत्तीमुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. आर्थिक स्थिती खराब राहील.

**कुंभ :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: पूर्व
पूर्वी केलेल्या कामाचा चांगला परिणाम दिसेल. मुलांच्या बाबतीत भावनीक समस्या निर्माण होतील.

**कन्या :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर
कामकाजात आलेली समस्या आपल्या प्रयत्नामुळे दूर होईल. बाहेरील व्यक्तींच्या कामकाजावर विशेष लक्ष द्या.

**मीन :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व
मागील स्मृती उजाळल्यामुळे दु:ख होईल. धार्मिक प्रवृत्तीत वाढ होईल. उच्च अधिकाऱ्यांच्या भेटी होतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९६२



### आडवे शब्द

१. 'खुल जा सिमसिम' हा मंत्र या बालकथेतला
८. आकडा, मांडी
९. एकूण एक, सर्व
११. कर भरणारा
१२. हिंदुस्थान
१३. अंत:करण
१६. फार पूर्वीपासून चालत आलेले व पुढे चालत राहणारे
१८. कुटुंबप्रमुख, नवरा (ग्रा.)
२०. किंमत
२१. अनारशावरचे दाणे
२३. बैलांचा सण
२५. बारीक दगड
२६. पातळ खांब
२७. विपत्तीची कहाणी
२८. धनी, स्वामी
२९. संतोष, आनंद
३१. धाडससाठी हे सशाचे असून कसे चालणार!
३२. दिवस
३४. इंग्रजीत वैमानिक
३५. मनाला आलेला थकवा
३७. गमन करणे
३८. पाऊल, पाय
४०. श्रीरामाचे एक नाव
४१. पुन्हा पुन्हा
४३. डोंगरावरून अखंड पडणारा पाण्याचा लोंढा
४४. एकाग्र नजर
४६. वजनदार
४७. उचंबळणारे, स्वैर
४८. परमेश्वर
४९. नूतन
५०. धपाटा
५३. फलक, टोपली
५४. शिखराचे टोक
५६. फटाक्यात आढणारे हिंदी डाळिब
५८. खिळे ठोकण्याचे साधन
६०. गळाला अडकणारा जलचर
६१. खबदाड
६३. ठाणे परिसरातील आदिवासी जमात
६५. कळ लावणारा मुनी
६७. मराठीत कोर्ट
६८. मुल
६९. चर्चा
७०. विनंती, मागणे

### उभे शब्द

१. या बाजूला, काही दिवसांपूर्वीच
२. गोणपाट, पोते
३. मुलांसाठी खस्ता खाणारी
४. नोकरी करणारा
५. नेहमी, नित्य
६. रात्रंदिन
७. सावली
८. शेवट
१०. मिरवणूक
१३. बंदी, मज्जाव
१४. दुर्लक्ष, करणे
१५. जरतारी पदरावर खुलून दिसणारा पक्षी
१६. सवड
१६अ. बाईलबुद्ध्या, होयबा (ला.)
१७. असा उपदेश काय कामाचा!
१८. दरवळ
१९. श्रीमंत
२०. न्यायालयीन कारवाईयोग्य गुन्हा
२२. मुरमाड
२४. अर्धांगवायू
२८. गर्व, मस्ती
२९. कम
ाजबरोबरचे वस्त्र
३०. लाज
३३. आरास, देखावा
३५. सहाय्य
३६. कृष्णाभक्तीपायी विषाचा पेला पिणारी स्त्री संत
३८. कमरेभोवतीचा धागा
३९. आकाश
४१. एक लांबलचक भाजी
४२. सिद्ध
४३. शुभ्र, पांढरा
४५. पाच दिवसाची क्रिकेट सामना
४६. वैदेही, सीता
४७. अतिशय, खूप
५१. खुंटी, मेख
५२. पुष्कळ
५३. एक त्वचारोग
५५. संपूर्ण
५६. '––– तो ब्रह्मा, उकार तो विष्णू, मकार महेश' (ज्ञानेश्वरी)
५७. कोवळा अंकूर
६२. चरण
६४. अस्वल
६६. करुणा, कीव

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ९६१ चे उत्तर

आडवे उत्तर १.नभ निळे रात निळी कान्हाही निळा ९.विष १०.वाटप ११.जग १२.नशा १३.कप १४.जनावर १६.मोहन १७.चरचरीत १९.रघु २१.पाट २२.वापर २३.धार २४.कातळ २५.कसकस २७.कोट २८.खटपट ३०.राधा ३१.सन ३२.तपासनीस ३५.चलनवलन ३६.अट ३७.पालट ३८.सक्षम ३९.आचारी ४१.काया ४२.चीक ४४.सामना ४५.रव ४७.रीतभात ४८.मतलबी ५०.टीका ५२.व ५३.कपाळ ५४.कटकट ५६.जरदा ५७.सरकारी ५९.सरळ ६०.कान ६१.आटपाटनगर ६५.कदरदान ६७.वळू ६८.कडवट ७०.वचनावचनी ७३.कलम ७४.करपल्लवी ७५.रातराणी ७६.रूमाल

उभे उत्तर : १.नवा करकरीत २.भट ३.निपज ४.राजवट ५.तगर ६.कालहरण ७.हीन ८.निशाचार ९.विपरीत १३.कचकावून १५.नापास १६.मोप १८.तळतळाट २०.घुस २२.वाटप २३.धावाधाव २६.कळस २७.कोट २८.खस २९.टचटचीत ३०.रानटी ३१.सनसनाटी ३३.पादचारी ३४.नीर ३६.अमर ३७.पाया ४०.रीतसर ४१.कातकरी ४३.कलकलाट ४६.वरदान ४८.मळकट ४९.बीट ५१.काजळ ५५.टसर ५७.सनदशीर ५८.कायदा ६०.काक ६२.पालव ६३.नवनीत ६४.गळू ६६.नववी ६८.कल ६९.डम रू ६९अ.टपाल ७१.नामी ७२.चरा ७३.कणी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### वर्टेक्स हिलिंग सेंटरतर्फे पदवीदान सोहळा संपन्न; उपस्थितांसाठी प्रेरणा


पुणे (दैनिक संध्या) : पुणे येथे नुकताच Vertex Healing Centre तर्फे श्रेयस बँकेट येथे भव्य-दिव्य पदवीदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या विशेष समारंभात संस्थेच्या संचालिका Dr. Manjusha Tandekar यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विविध क्षेत्रातील रेकी ग्रँड मास्टर, एंजल मास्टर ट्रेनर, मनी रेकी ग्रँड मास्टर तसेच प्रोफेशनल टॅरो कार्ड रीडर्स यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे आणखी एक प्रमुख आकर्षण म्हणजे अवघ्या १७ वर्षीय Shivansh Tandekar लिखित "The Things Teenagers Don't Say" या पुस्तकाचे प्रकाशन होय. तरुण पिढीच्या भावना, विचार आणि न बोलल्या जाणाऱ्या मनोविश्वाला स्पर्श करणाऱ्या या पुस्तकाचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते उत्साहात प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती आयुष्यमुळे अध्यक्ष Dr. Rajan Sancheti, विंभ पब्लिकेशनचे संचालक Deepak Prabhat, नागपूर येथील भारतीय मजदूर कामगार संघाचे Shankarrao Pahade, तसेच Yograj Katbari, Sharada Katbari, मुंबई येथील यशश्री लाईफ कोच Dr. Suvarna Surve आणि अमरावती येथील Mahesh Kumar Tandekar यांची मान्यवर उपस्थिती लाभली होती. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने आणि सकारात्मक ऊर्जेने कार्यक्रमात सहभाग नोंदवला. संपूर्ण समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आणि यशस्वीरित्या पार पडला. गेल्या अनेक वर्षांपासून Vertex Healing Centre हे केंद्र लोकांच्या जीवनात आनंद, आत्मविश्वास आणि मानसिक सकारात्मकता निर्माण करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. Dr. Manjusha Tandekar यांनी तयार केलेले विद्यार्थी आज केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतात तसेच विदेशातही कार्यरत असून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणत आहेत. मानसिक, आध्यात्मिक आणि वैयक्तिक विकासाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडविण्याचा संदेश देणारा हा सोहळा उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.



### पं. जवाहरलाल नेहरु यांच्या पुण्यतिथी निमित्त भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण

पुणे (दैनिक संध्या) : स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथी निमित्त आज पं. नेहरू स्टेडियम येथील त्यांच्या पुतळ्यास मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर कॉंग्रेस भवन येथे त्यांच्या प्रतिमेस पुणे शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप व पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दिप्ती चवधरी यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी आमदार मोहन जोशी, प्रदेश प्रवक्ते गोपाळ तिवारी, युवक अध्यक्ष सौरभ अमराळे, महिला अध्यक्षा स्वाती शिंदे, सुरेश कांबळे, सुभाष थोरवे, दिपक ओव्हाळ, ॲड. राजश्री अडसूळ, अविनाश खंडारे, आशिष व्यवहारे, दिलीप लोळगे, रमेश सोनकांबळे, स्वप्निल नाईक, नरसिंह आंदोली, गौरव बाळिंदे, ऋग्वेदिता सपकाळ आदी उपस्थित होते.

### सावरकर जयंतीनिमित्त 31 रोजी पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांचे व्याख्यान



पुणे (दैनिक संध्या) : स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त ब्राह्मण सांस्कृतिक संघ बाणेर आणि हर घर सावरकर या संस्थांच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार व प्रभावी वक्ते पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले आहे. येत्या रविवारी (ता. ३१ मे) सायंकाळी ६ वाजता बाणेर येथील माऊली गार्डनमध्ये हे व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमासाठी हिंदू अध्यात्मिक सेवा संस्थेचे अध्यक्ष व प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक कृष्णकुमार गोयल, सावरकर विचार दर्शनचे संपादक व स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नातू सात्यकी सावरकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे. मात्र, कार्यक्रमाच्या नियोजनासाठी पूर्वनोंदणी आवश्यक असून, https://forms.gle/Ld5W1Lz1zSHN1P9w8 या लिंकवर नोंदणी करता येईल. मोफत प्रवेशिका व अधिक माहितीसाठी ९८२२३७७९३३, ९८२०९४१३४१, ९८५०१८८४६८, ९८५०१८५२९६ किंवा ८०८०००१३३८ या क्रमांवर संपर्क साधावा, असे आवाहन संयोजक व ब्राह्मण सांस्कृतिक संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

### शंभू राजेंचा अमरत्वापर्यंतचा थरारक प्रवास वीरांचे वीर धर्मवीरमधून उलगडणार




पुणे (दैनिक संध्या) : छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रम, युद्धनीती आणि स्वराज्य रक्षणासाठीच्या अतुलनीय संघर्षाचा जीवनप्रवास 'वीरांचे वीर धर्मवीर' या विवेक व्यासपीठ आयोजित अभिनव कार्यक्रमातून उलगडण्यात येणार आहे. शंभू चरित्र - जन्मापासून अमरत्वापर्यंत मांडणारा हा दृकश्राव्य प्रयोग शनिवार, दि. ३० मे २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता लेडी रमाबाई हॉल, एस. पी. कॉलेज, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास पुण्याच्या महापौर मंजुषा दीपक नागपुरे यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमाची संकल्पना, लेखन आणि सादरीकरण नीलेश रमेश भिसे यांचे असून, संभाजी महाराजांचे जीवन, त्यांचे कार्य, लेखन, विविध मोहिमा आणि युद्धनीती यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात येणार आहे. अभिवाचन, चलचित्र, ॲनिमेशन, संगीत आणि प्रकाशयोजनेच्या माध्यमातून इतिहासातील विविध प्रसंग जिवंत केले जाणार आहेत. नीलेश भिसे म्हणाले, जन्मापासून ते अमरत्वापर्यंतचा संभाजी महाराजांचा प्रवास या कार्यक्रमातून उलगडण्यात येणार आहे. कोणतीही लढाई न हरता स्वराज्य टिकवण्यासाठी आणि वाढवण्यासाठी त्यांनी दिलेला लढा, त्यांची ग्रंथसंपदा, न्यायनिवाडे, हिंदवी स्वराज्याच्या विस्तारासाठी घोड्याच्या पाठीवर लादलेले सिंहासन आणि औरंगजेबाला दिलेली कडवी झुंज यांचे प्रभावी चित्रण या कार्यक्रमात करण्यात येईल. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला असून पुणेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

# आरक्षणातील उपवर्गीकरणाबाबत सर्वसमावेशक व समतोल विचार व्हावा

## डॉ. हुलगेश चलवादी : उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर सुवर्णमध्य काढण्याचे आवाहन

पुणे (दै. संध्या)



महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील आरक्षणाच्या उपवर्गीकरणाबाबत सध्या सामाजिक व राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चे सर्वेसर्वा तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी पक्षाची समतोल भूमिका स्पष्ट केली आहे. आरक्षणाचा लाभ समाजातील शेवटच्या आणि अत्यंत वंचित घटकांपर्यंत पोहोचावा. मात्र उपवर्गीकरणामुळे दलित समाजात फूट पडेल; ही भीती दूर करण्याची गरज आहे. बौद्ध समाजावर अन्याय होणार नाही, याची काळजी सरकारने घ्यावी, अशी भूमिका पक्षाची असल्याचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी म्हणाले.

राज्यात अनुसूचित जातीमध्ये एकूण ५९ जातींचा समावेश आहे. आजवरच्या प्रवासात काही जातींना आरक्षणाचा चांगला फायदा झाला आहे, तर ज्या जातींमध्ये शिक्षणाचे प्रमाण अजूनही कमी आहे, त्या आरक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून काहीशा दूर राहिल्या आहेत. याच वस्तुस्थितीमुळे मातंग समाजाकडून उपवर्गीकरणाची मागणी सातत्याने केली जात आहे. मात्र, ही मागणी पूर्ण करताना आंबेडकरी अनुयायांची आणि प्रामुख्याने बौद्ध समाजाची भावनाही समजून घेणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे डॉ.चलवादी यांनी स्पष्ट केले.

बौद्ध समाजाने गेल्या काही दशकांत शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. शिक्षण आणि जागृतीमुळेच हा समाज पुढे जाऊ शकला. त्यामुळे उपवर्गीकरणाचा कोणताही निर्णय घेताना या प्रगत घटकांवर कोणताही अन्याय होता कामा नये, ही आमची आग्रहाची भूमिका आहे. आरक्षणाचा लाभ मिळवण्यासाठी इतर समाज बांधवांनीही शिक्षणामध्ये गतीने प्रगती करणे आवश्यक आहे, कारण शिक्षण हाच प्रगतीचा खरा पाया आहे, असे डॉ.चलवादी म्हणाले.

आपण सर्व अनुसूचित जाती म्हणून आधी एकत्र आले पाहिजे. एकजूट हीच आपली सर्वात मोठी ताकद आहे. आपल्यात कितीही मतप्रवाह किंवा विचार असले, तरी आपण सर्वांनी एकत्र बसून, सखोल चर्चा करून आणि तज्ज्ञांचे योग्य मार्गदर्शन घेऊनच यावर एकमताने सुवर्णमध्य आणि योग्य तो तोडगा काढला पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला संविधानाच्या माध्यमातून हक्क मिळवून दिले आहेत, त्यामुळे कोणताही निर्णय घेताना समाजातील शेवटच्या, अत्यंत मागास घटकाला न्याय मिळालाच पाहिजे; पण तो न्याय मिळवताना संपूर्ण समाज सोबत असला पाहिजे. आम्ही या संदर्भातील अधिकृत जनगणनेची वाट पाहू, वस्तुस्थिती समजून घेऊ आणि सलोख्याने चर्चा करूनच पुढचा मार्ग ठरवू; पण कोणत्याही परिस्थितीत समाजात फूट पडू देणार नाही, हाच आपला ठाम निर्धार असला पाहिजे, अशी भूमिका मा.आठवले साहेबांची असल्याचे चलवादी म्हणाले.

उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर राज्य सरकारने घाईघाईने कोणताही निर्णय न घेता समाजातील सर्व घटकांच्या, विविध संघटनांच्या आणि तज्ज्ञांच्या सूचनांचा व भावनांचा सखोल विचार करावा. कोणत्याही घटकावर अन्याय न करता, सर्वसमावेशक आणि समतोल मार्ग कसा काढता येईल, यावर सरकारने गांभीर्याने विचार करावा," असे आवाहन डॉ.हुलगेश चलवादी यांनी केले आहे.सर्व समाज घटकांमध्ये परस्पर सलोखा, बंधुभाव राखून सर्वांना विकासाची समान संधी मिळवून देणे, हाच आरपीआयचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी शेवटी नमूद केले.

## सामाजिक न्याय विभागाच्या विविध शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू

पुणे (दै. संध्या)

**इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन**

सामाजिक न्याय विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह (नविन), गुणवडी ता. बारामती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह सासवड ता. पुरंदर व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतीगृह तळेगाव दाभाडे येथे प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इयत्ता ७ वी नंतर शालेय शिक्षण, कनिष्ठ महाविद्यालय, बिगर व्यावसायिक तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय अनुसूचित जातीमधील होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना मोफत शासकीय वसतिगृह प्रवेश देण्यात येणार आहे. वसतिगृह प्रवेश हा प्रवर्गनिहाय आरक्षण व गुणवत्तेनुसार करण्यात येणार आहे. शासकीय वसतिगृहात विद्यार्थ्यांना विनामूल्य निवास, आंथरूण-पांघरूण, भोजन सुविधा, पुस्तके, स्टेशनरी, विविध शैक्षणिक बाबींसाठी आर्थिक सहाय्य तसेच दरमहा निर्वाह भत्ता यासह विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी https://hmas.mahait.org/ या संकेतस्थळावर जाऊन प्रवेशासंबंधित सूचना वाचून ऑनलाईन अर्ज भरावा, असे आवाहन वस्तीगृहाच्या गृहपालाकडून करण्यात आले आहे.

## पुण्याच्या अनिका दुबेची आशियाई स्क्वॉश स्पर्धेत दमदार कामगिरी

पुणे (दै. संध्या)

■ रौप्यपदक जिंकत महाराष्ट्राचे नाव उज्वल




पुण्याच्या १६ वर्षीय अनिका दुबेने चीनमध्ये झालेल्या Asian Junior Squash Championships मध्ये रौप्यपदक जिंकत मोठी कामगिरी केली आहे. आशियातील अव्वल युवा स्क्वॉश खेळाडूंमध्ये उपविजेतेपद मिळवत अनिकाने महाराष्ट्राचे नाव उज्वल केले आहे. स्क्वॉश क्षेत्रात महाराष्ट्रातून अशी कामगिरी करणाऱ्या मोजक्या खेळाडूंमध्ये तिची गणना होत आहे.

'पुण्याची गोल्डन गर्ल' म्हणून ओळख मिळवलेल्या अनिकाने याआधीही कमी वयात आशियाई स्तरावर पदक जिंकले होते. आता पुन्हा एकदा तिने दमदार खेळ दाखवत स्वतःची छाप उमटवली आहे.

अनिका ही Chance2Sports Foundation Program आणि SportsSkill या उपक्रमांतर्गत प्रशिक्षण घेत आहे. याच कार्यक्रमातील वसुंधरा नांगरे आणि आकांक्षा गुप्ता यांनीदेखील स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत प्री-क्वार्टरफायनलपर्यंत मजल मारली.

SportsSkillचे सहसंस्थापक आणि अनेकवेळा राष्ट्रीय विजेते ठरलेले अभिनव सिन्हा म्हणाले, "अनिकाचे हे यश तिच्या मेहनतीचे आणि सातत्यपूर्ण प्रशिक्षणाचे फळ आहे. फिटनेस, शिस्त आणि मानसिक तयारी यावर आम्ही विशेष भर देतो आणि त्याचा फायदा खेळाडूंना होत आहे."

तर ज्येष्ठ टेनिसपटू आणि SportsSkillचे सहसंस्थापक चेतन देसाई म्हणाले, "अनिकाने गेल्या अनेक वर्षांपासून खूप मेहनत घेतली आहे. तिचे हे यश पुण्यासाठी आणि भारतीय स्क्वॉशसाठी अभिमानाची बाब आहे."

गेल्या काही वर्षांत Kanga Kids Program कडूनही या खेळाडूंना महत्त्वाचे सहकार्य मिळाले आहे. प्रशिक्षण, स्पर्धांचा अनुभव आणि खेळाडूंच्या विकासासाठी या मदतीचा मोठा उपयोग झाला.

SportsSkill आता स्पोर्ट्स सायन्स, फिटनेस आणि रिकव्हरी सिस्टिमच्या मदतीने आणखी युवा खेळाडू तयार करण्यावर काम करत आहे. अनिका, वसुंधरा आणि आकांक्षा यांच्या यशामुळे पुण्यातील स्क्वॉशला नवी ओळख मिळत असल्याचे बोलले जात आहे.

## मराठवाडा रत्नांचा गौरव : आदर्श माता-पिता पुरस्काराने मान्यवरांचा सन्मान

हडपसर (दै. संध्या)



मराठवाडा मित्र परिवार आणि मराठवाडा बहुउद्देशीय प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या "आदर्श माता-पिता पुरस्कार वितरण सोहळा २०२६" या भव्य कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मराठवाडा रत्नांच्या माता-पित्यांचा सन्मान करण्यात आला.

उर्मिलाताई कराड सभागृह, एमआयटी कॉलेज, लोणी काळभोर (पुणे) येथे संपन्न झालेल्या या सोहळ्यात श्रीमंत युवराज संभाजीराजे शाहू छत्रपती महाराज यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र राज्य हे होते.

यावेळी मा. श्रीकांत डिसले (अपर पोलीस अधीक्षक, पुणे), मा. श्रीकांत शेळके, मा. प्रा. डॉ. महेश थोरवे आणि मा. ॲड. अमोल पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यंदाच्या पुरस्कार सोहळ्यात सामाजिक, प्रशासकीय, पत्रकारिता, उद्योग, वैद्यकीय, साहित्य व लोककला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या माता-पित्यांचा गौरव करण्यात आला. यामध्ये डॉ. ज्योती मेटे, विक्रम गायकवाड, दीपक आकडे, राहुल कुलकर्णी, अनंत बिरादार, रामचंद्र पवार, सुरेश झांबरे, मंगेश चिवटे, शरद तांदळे, डॉ. भास्कर पाटील आणि कृष्णाई उळेकर यांच्या माता-पित्यांना आदर्श माता-पिता पुरस्कार प्रदान करण्यात आला.

संघर्षमय परिस्थितीत मुलांना शिक्षण, संस्कार आणि जीवनमूल्यांची शिकवण देऊन त्यांना यशाच्या शिखरावर पोहोचविणाऱ्या कर्तृत्ववान माता-पित्यांचा गौरव करताना सभागृहात उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

तसेच पोलीस निरीक्षक सुरेश जायभाय लिखित लाल पाणी या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाचे संयोजन उद्योजक रविराज पाटील,पत्रकार महेश टेळेपाटील, उद्योजक शरद दताळ, राजेंद्र नारायणपूरे, किशोर पाटील, दत्ता भांडवलकर, रणजीत गोदामगावे, दत्तात्रय राठोडे, मुरलीधर पवार, विठ्ठल चव्हाण, अरुण पवार, राजेंद्र हाजगुडे आदींनी केले. मराठवाड्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, उद्योजक, प्रशासकीय अधिकारी, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहात पार पडला.

"आई-वडिलांचे संस्कार हीच खरी संपत्ती असून, यशस्वी पिढी घडविण्यामागील त्यांच्या योगदानाचा सन्मान करणे हीच या उपक्रमाची खरी प्रेरणा आहे," असा संदेश यावेळी देण्यात आला.

## राज्यात लाळखुरकत लसीकरण मोहिम-९ ची जय्यत तयारी

पुणे (दै. संध्या)

■ १.१९ कोटी लस मात्रा उपलब्ध होणार



राज्यात लाळखुरकत रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत लसीकरण फेरी-९ साठी पशुसंवर्धन विभागाने पूर्वतयारीला वेग दिला आहे. मे अखेरपर्यंत राज्याला १ कोटी १९ लाख लस मात्रा उपलब्ध होणार असून, लसींच्या सुरक्षित साठवणुकीसाठी आणि वितरणासाठी नियोजन सुरू करण्यात आले आहे अशी माहिती आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिली. लसींचा साठा सुरक्षित ठेवण्यासाठी नव्याने २० 'वॉक-इन कोल्ड-रूम' उभारण्यात आल्या असून, प्रत्येक शीतगृहात सुमारे ३ लाख लस मात्रा साठवण्याची क्षमता आहे. याशिवाय विद्यमान शीतगृहांचाही पूर्ण क्षमतेने वापर करण्यात येणार आहे. आतापर्यंत लाळखुरकत लसीकरणाच्या ८ फेऱ्या यशस्वीपणे पूर्ण झाल्या असून, प्रभावी लसीकरणामुळे राज्यात अलीकडील काळात रोगाचा उद्रेक आढळलेला नाही. सलग दोन वर्षे रोगप्रादुर्भाव न झाल्यास महाराष्ट्राला 'लाळखुरकत रोगमुक्त' दर्जा मिळण्याची शक्यता असून, त्यामुळे दुग्ध, मांस आणि अंडी यांसारख्या पशुजन्य उत्पादनांच्या निर्यातीला चालना मिळू शकते. जिल्हानिहाय लस साठवण क्षमता तपासून माहिती तातडीने सादर करण्याचे आदेश आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिले आहेत. तसेच ऑगस्ट २०२६ पासून प्रत्यक्ष लसीकरण मोहीम सुरू करण्यासाठी विभागाने तयारी सुरू केली आहे.

# आयुर्वेद ही अचूक रोगनिदानाची शास्त्रशुद्ध विचारपद्धती

## डॉ. हरिश पाटणकर यांचे प्रतिपादन; लंडनमधील 'एपीए आयुर्फेस्ट २०२६'मध्ये बीजभाषण

पुणे (दै. संध्या)



आयुर्वेदातील रोगनिदान ही केवळ लक्षणांवर आधारित प्रक्रिया नसून, शरीर, मन आणि प्रकृतीचा सखोल अभ्यास करणारी शास्त्रशुद्ध विचारपद्धती आहे. दोष, धातू आणि मल या मूलतत्त्वांच्या आधारे कोणत्याही रोगाचे अचूक निदान करता येते. रोगाचे निदान, त्याचे समूळ नष्ट करण्याची क्षमता आयुर्वेदामध्ये असून, आयुर्वेदाला अधिक प्रभावी करण्यासाठी संशोधन व तंत्रज्ञानाची जोड द्यायला हवी," असे प्रतिपादन पुण्यातील प्रख्यात आयुर्वेदतज्ज्ञ, संशोधक आणि भारतीय ज्ञानपरंपरेचे अभ्यासक डॉ. हरिश पाटणकर यांनी केले.

लंडन येथील आयुर्वेद प्रोफेशनल्स असोसिएशनच्या वतीने 'एपीए आयुर्फेस्ट २०२६', या आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. पाटणकर यांचे 'भारतीय आयुर्वेदाची मूलभूत तत्वे' यावर बीजभाषण झाले. या परिषदेत जगभरातील सुमारे दोनशेहून अधिक नामवंत आयुर्वेदतज्ज्ञ, संशोधक आणि व्यावसायिकांची उपस्थिती होती. डॉ. विजय मूर्ती, लोथार पिर्क, डॉ. करेन ओ'ब्रायन-कोप, डॉ. मनीष पंडित, डॉ. सुनिल कुमार, डॉ. रूपी औजला, डॉ. विनायक अबॉट, डॉ. कांचन शर्मा, डॉ. ख्रिस्तोफर एथरिज, डॉ. स्नेहल पाटणकर यांसारखे आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. पाटणकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

डॉ. पाटणकर यांनी आपल्या भाषणात आयुर्वेदातील दोष, धातू आणि मल या मूलभूत तत्त्वांच्या आधारे रोगनिदान करण्याच्या व्यापक विचारपद्धतीचे विवेचन केले. आयुर्वेद ही केवळ उपचारपद्धती नसून शरीर, मन आणि प्रकृतीचा एकत्रित विचार करणारे संपूर्ण जीवनशास्त्र असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पारंपरिक ज्ञानाची आधुनिक संदर्भात केलेली मांडणी, चिकित्सक दृष्टिकोन आणि संशोधनाधारित विचार यामुळे उपस्थित विदेशी व्यावसायिक विशेष प्रभावित झाले. भारतीय आयुर्वेदाची सखोलता आणि जागतिक आरोग्य व्यवस्थेमधील त्याचे महत्त्व या व्याख्यानातून प्रभावीपणे अधोरेखित झाले. डॉ. पाटणकर हे 'केशायुर्वेद' या भारतातील पहिल्या आर्युवेदिक हेअर टेस्टिंग लॅब अँड रिसर्च सेंटरचे संस्थापक संचालक आहेत. आयुर्वेद संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम घडवणारे संशोधक म्हणून त्यांची ओळख आहे. 'केशायुर्वेद'ला २०२२ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'बेस्ट आयुष स्टार्टअप' हा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. तसेच डॉ. पाटणकर प्राचीन संहिता गुरुकुल संस्थेमार्फत आयुर्वेद शिक्षण, भारतीय ज्ञानपरंपरा आणि संस्कृताधारित वैद्यकीय वारसा जतन करण्यासाठी कार्यरत आहेत. देश-विदेशातील विद्यार्थ्यांना भारतीय आयुर्वेदाची शास्त्रीय मांडणी समजावून सांगण्याचे कार्य त्यांच्या संस्थेमार्फत केले जात आहे.

## जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/271/25 दिनांक:- 20.5.2026.

**नोटीस**

हमीद गुलाब पटेल, मु.पो. राजुरी, ता. जुन्नर, जि पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत राजुरी - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार हमीद गुलाब पटेल. मु.पो.राजुरी, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वतः नामे **हमीद गुलाब पटेल यांचा जन्म 1.6.1973 रोजी मौजे राजुरी, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं.271/25 दिनांक रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 20/5/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

शिक्का

## जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/223/25 दिनांक:- 20.5.2026.

**नोटीस**

सलीम इस्माईल पटेल, मु. पो. राजुरी ता. जुन्नर जि. पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत राजुरी - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार सलीम इस्माईल पटेल मु.पो.राजुरी, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वतः नामे **सलीम इस्माईल पटेल यांचा जन्म 2.6.1970 रोजी मौजे राजुरी, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 223/25 दिनांक रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 20/5/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

शिक्का

## जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/518/25 दिनांक:- 20.5.2026.

**नोटीस**

नुर महंमद दाउद शेख, मु.पो. राजुरी, ता. जुन्नर, जि पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत राजुरी - **प्रतिवादी**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार नुर महंमद दाउद शेख मु.पो.राजुरी, ता. जुन्नर. जि पुणे यांची स्वतः नामे **नुर महंमद दाउद शेख यांचा जन्म 2.6.1969 रोजी मौजे राजुरी, ता. जुन्नर जि. पुणे येथे झालेला आहे.** यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३(३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. 518/25 दिनांक रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वत: अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 20/5/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

**सही/-**
**(अर्चना तांबे)**
**अति. उपविभागीय दंडाधिकारी**
**जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)**

शिक्का

## जाहीर नोटीस

**मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.**

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/470/25 दिनांक:- 20.5.2026.

**नोटीस**

महंमद याकुब चौगुले, मु.पो. राजुरी, ता. जुन्नर, जि पुणे - **अपिलार्थी**

**विरुध्द**

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी ग्रामपंचायत राजुरी - **प्रतिवादी**

आळंदी (दैनिक संध्या) : कमला एकादशीच्या पावन मुहूर्तावर आळंदी नगरपरिषद, इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च फंडेड प्रकल्प आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने "गौ-आहार संकलन टोपली" या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्या हस्ते करण्यात आला. या उपक्रमांतर्गत आळंदीतील प्रत्येक प्रभागात घरोघरी विशेष टोपल्या वितरित करण्यात येणार असून, घरांमध्ये अतिरिक्त उरलेला अन्नसाठा तसेच पशुपयोगी खाद्य कचऱ्याचे संकलन दररोज सायंकाळी केले जाणार आहे. संकलित अन्न वडगाव रोड येथील गोशाळेत सुपूर्द करण्यात येणार असून, यामुळे गोमातेची सेवा आणि शहर स्वच्छता हे दुहेरी उद्दिष्ट साध्य होणार आहे. पर्यावरणपूरक आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या अभिनव संकल्पनेची अंमलबजावणी केल्याबद्दल प्रशासनातील अधिकारी, संबंधित संस्था आणि संस्थाचालकांचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर, उपाध्यक्षा सुजाता तापकीर, गटनेते सचिन गिलबिले, नगरसेवक आदित्य घुंडरे, सागर कुऱ्हाडे, संतोष रासकर, ऋतुजा घुंडरे आणि पूजा घुंडरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## आंबेगाव शिरूर तालुक्यातील ३५ गावांना दिलासा

मंचर (दै. संध्या)

हुतात्मा बाबू गेनू सागर धरणातून (डिंभे धरण) उजव्या कालव्यात मंगळवारी (ता. २६) १८० क्युसेस पाणी सोडण्यात आले आहे. मंचर अवसरी खुर्द येथून पाणी कालव्यातून पुढे गेले आहे. आंबेगाव व शिरूर तालुक्यातील सुमारे ३५ गावे व ५० वाड्या वस्त्यावरील शेतीच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. सध्या पर्जन्यमान लांबणीवर पडल्याने व उन्हाची तीव्रता वाढत असल्याने अनेक विहिरींनी तळ गाठलेला आहे. भाजीपाला, ऊस, कांदा, गुरांसाठी शेतात असलेले गवत तसेच इतर हंगामी पिकांसाठी पाण्याची नितांत गरज होती. अवसरी खुर्द ग्रामपंचायतीचे सरपंच तथा प्रशासक प्रसाद कराळे, दिनेश खेडकर, आदर्श गाव गावडेवाडी चे माजी उपसरपंच किरण गावडे, निघोटवाडी ग्रामपंचायत च्या सदस्य उषा संजय चिंचपुरे यांच्यासह शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने राज्याचे माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांची रविवारी (ता. २४) भेट घेऊन कालव्यात पाणी सोडण्याची मागणी केली होती. वळसे पाटील यांनी ताबडतोब जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना याबाबत सूचना दिल्या. त्यामुळे उजव्या कालव्यातील पाण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. सध्या सोडण्यात आलेले पाणी अवसरी खुर्द,मेगडेवाडी गाव परिसरातून पुढे मार्गस्थ झाले असून कालव्याच्या परिसरातील शेतकरी पाण्याच्या आगमनाकडे आशेने पाहत होते.

## बारामती शहर व तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाच्या पदाधिकारी-कार्यकर्ता संवाद बैठकीत नव्या नियुक्त्या जाहीर

बारामती (दै. संध्या)



काल दि. २५ मे २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाच्या वतीने पदाधिकारी व कार्यकर्ता संवाद बैठक महावीर भवन,तीन हत्ती चौक (तिरंगा सर्कल),बारामती येथे उत्साहात पार पडली.ही बैठक युवा नेते मा. युगेंद्रदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.यावेळी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाच्या वतीने श्री.सुरेश खलाटे (अध्यक्ष,सहकार सेल बारामती तालुका),श्री.बापुराव गायकवाड गुरुजी (अध्यक्ष,बारामती तालुका शिक्षक सेल),श्री.मारुती बापू तावरे यांची (अध्यक्ष,बारामती तालुका किसान सेल),डॉ.पिसाळ फोंडवाडा (अध्यक्ष,डॉक्टर सेल बारामती तालुका) व श्री निलेश गायकवाड (अध्यक्ष,औद्योगिक विकास सेल बारामती तालुका) या पदाधिकाऱ्यांना निवडीचे पत्र मा. युगेंद्रदादा पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

यावेळी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पक्षाचे अध्यक्ष श्री राजेंद्र बापु जगताप, मा.जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. सतीश मामा खोमणे,श्री.सुभाष आप्पा ढोले व इतर पदाधिकारी तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

त्यानंतर आज कृषिभूषण प्रल्हाद वरे यांनी त्यांच्या निवासस्थानी श्री. बापुराव गायकवाड व श्री.मारूती तावरे या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना निमंत्रित करून शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.सदर सत्कार समारंभास धन्यकुमार जगताप,ज्ञानेश्वर तावरे, हनुमंत वरे तसेच भाऊसाहेब आडके आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर नियुक्तींमुळे बारामती तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी मिळणार असल्याची भावना कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## कांद्याला कवडीमोल भाव मिळत असल्याने अनेक शेतकरी हवालदील

माळेगाव (दै. संध्या)

- कांदा रस्त्यावर फेकून देण्याऐवजी मोफत वाटप
- सांगवी गावातील प्रगतशील शेतकरी भानुदास भगवान जगताप यांचा दानशूरपणा



कांद्याला कवडीमोल भाव मिळत असल्याने अनेक शेतकरी हवालदिल झाले आहेत.मात्र अशाच कठीण परिस्थितीत एका शेतकऱ्याने माणुसकीचा आदर्श घालून दिला आहे.उत्पादन केलेला कांदा रस्त्यावर फेकून देण्याऐवजी त्यांनी गोरगरिबांना मोफत वाटून समाजासमोर दानशूरपणाचे उत्तम उदाहरण ठेवले आहे.सांगवी ता.बारामती येथे जिल्हा परिषदेचा आदर्श सरपंच पुरस्कार मिळालेले प्रगतशील शेतकरी भानुदास भगवान जगताप असे दानशूर शेतकऱ्याचे नाव आहे.भानुदास जगताप हे अल्पभूधारक शेतकरी असून त्यांनी आपल्या तीन एकर क्षेत्रात कांदा हे पिक घेतले होते. कांदा लागवडी पासुन उत्पादन घेईपर्यंत पत्नी विमल जगताप व दोन मुले सिध्दार्थ व अमर जगताप यांनी खुप मेहनत घेतली.कांद्याचे चांगले उत्पादन झाले.साधारणपणे ५५ ते ६० किलोच्या ३५० पिशव्यांचे उत्पादन झाले.कष्टाने पिकवलेल्या कांद्याला बाजारात योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू आहेत.उत्पादन खर्चही निघत नसताना अनेक शेतकरी निराश झाले आहेत. अशा वेळी या शेतकऱ्याने निराश न होता सामाजिक बांधिलकी जपत सांगवी गावातील गरजू कुटुंबांना चक्क ५५ ते ६० किलो वजनाच्या तब्बल २७० कांद्याच्या गोणीचे मोफत वाटप केले.तसेच उन्हामुळे कांदा खराब झाल्याने इतर गोण्या शेतात खत म्हणून वापरण्यासाठी टाकला. त्यांच्या या कृतीमुळे समाजात माणुसकी अजून जिवंत असल्याचा संदेश मिळाला. शेतकरी हा केवळ अन्नदाता नसून समाजाचा आधारस्तंभ आहे,हे या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाले आहे.स्वतः आर्थिक संकटात असतानाही दुसऱ्यांच्या मदतीसाठी पुढे येणे,ही मोठी दानशूर वृत्ती आहे. पैशापेक्षा माणुसकी मोठी असते,हे या शेतकऱ्याने आपल्या कृतीतून दाखवून दिले.

> शेतकऱ्यांचे मन फार मोठे आहे. शेती परवडत नसली तरी जगाचा पोशिंदा म्हणून काम करावे लागते. कांदा फेकून देण्याऐवजी त्याचे मोफत वाटप करणे पसंत केले. शासनाने शेतकऱ्यांच्या पिकांना हमी भाव द्यावा.हमी भाव मिळाला तरच शेती करता येईल.अन्यथा शेतकऱ्यांना जगणे मुश्किल होईल.
>
> **- भानुदास भगवान जगताप**
> **- शेतकरी सांगवी ता.बारामती**

## प्लॅस्टिक बंदी केवळ कागदावरच

नारायणगाव (दै. संध्या)

ओतूर परिसरात बंदी असलेल्या प्लॅस्टिक कॅरीबॅगच्या वापरावर केवळ फलकांपुरतीच बंदी उरली आहे. पर्यावरण संरक्षण आणि प्लास्टिक मुक्त गावच्या संकल्पनेला चालना देण्यासाठी ओतूर किराणा व्यापारी असोसिएशनने कॅरीबॅग बंदीचा महत्वाचा निर्णय घेतला होता. या निर्णयानुसार अनेक किराणा दुकानदारांनी आपल्या दुकानांवर कॅरीबॅग बंदीचे फलक लावले असून ग्राहकांना कापडी पिशव्या किंवा पर्यायी साधनांचा वापर करण्याचे आव्हान केले होते. बाजारात सर्रासपणे पातळ प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर होत असून ग्रामपंचायत प्रशासनाकडून ठोस कारवाई आणि जनजागृतीचा अभाव स्पष्टपणे दिसून येत असल्याने या अंमलबजावणीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.ओतूरमधील भाजी विक्रेते, फळ विक्रेते ,मटन विक्रेते, हॉटेल व्यवसायिक, किराणा दुकाने आणि किरकोळ विक्रेत्यांकडून ग्राहकांना सर्रास ७५ ते १२० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या निषिद्ध कॅरीबॅग दिल्या जात आहेत. काही ठिकाणी ग्राहकांनी कापडी पिशव्या आणल्या तरी विक्रेते स्वतःहून प्लास्टिक पिशव्या देत असल्याचे प्रकार घडत आहेत.या अनियंत्रित प्लास्टिक वापरामुळे ओतूर आणि परिसरातील सांडपाण्याची गटारे तुंबणे व कचऱ्याचे साम्राज्य पसरणे यांसारख्या गंभीर समस्या उद्भवत आहेत.फळ विक्रेते, भाजीवाले यांच्यासाठी कापडी किंवा कागदी पिशव्यांचे स्वस्त पर्याय मोठ्या प्रमाणावर उपलब्ध नसल्याने प्लास्टिकचा वापर अपरिहार्य बनला आहे. प्लॅस्टिकची बंदी असूनही या प्लास्टिक कॅरीबॅग चा पुरवठा नेमका कुठून होत आहे असा प्रश्न निर्माण झाला आहे. संबंधित घाऊक विक्रेते किंवा पुरवठादार यांच्यावर कारवाई केल्याशिवाय ही बंदी प्रभावीपणे राबवता येणार नाही असे मत नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते नंदा आबनावे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

### आमदार योगेश टिळेकर यांच्यासह स्थानिक नगरसेवक पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

मांजरी (दै. संध्या)



प्रभाग क्र.पंधरा मधील लोकप्रिय नगरसेविका नंदा अनिल आबनावे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन दिनांक 24 मे रविवारी सायंकाळी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पार पडले जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून भाजपाच्या नगरसेविका नंदा आबनावे प्रभाग 15 मधील जनसामान्यांचे प्रश्न सोडवण्याचे प्रभावीपणे काम करतील असे मत महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केशवनगर येथे बोलताना व्यक्त केले.

प्रभाग 15 च्या पहिल्याच निवडणुकीत भरघोस मतांनी विजयी झालेल्या भाजपाच्या नगरसेविका नंदा आबनावे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचा उद्घाटन समारंभ तथा कृतज्ञता संवाद सभा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात होते यावेळी उद्घाटक या नात्याने मंत्री चंद्रकांत पाटील बोलत होते.प्रमुख पाहुणे म्हणून आमदार योगेश टिळेकर हडपसर प्रभाग समिती अध्यक्ष नगरसेवक प्रशांत तुपे,नगरसेवक उमेश गायकवाड,नगरसेवक किशोर धायरकर,नगरसेवक दादा कोद्रे,नगरसेविका उज्वला जंगले, नगरसेविका सारिका घुले,पुणे कॅन्टोन्मेंट बँकेचे संचालक अनिल आबनावे,उद्योगपती अविनाश आबनावे,जिल्हा परिषद माजी सदस्य वंदना कोद्रे,भाजपा नेते भूषण तुपे,रवी तुपे,संदीप तुपे,गणेश घुले,शिवराज घुले,बाळासाहेब घुले,समीर घुले,शक्ती प्रधान,मुकेश भाट, संजय गायकवाड,अशोक पठारे, महिला नेत्या सविता हिंगणे,प्रांजल किशोर धायरकर आदी मान्यवर भाजपा कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने प्रभाग 15 मधील नागरिक महिला युवक यावेळी उपस्थित होते.पूर्व भागातील वाहतूक कोंडी,पाणीटंचाई,पर्यायी रस्ते, पाणी या प्रलंबित नागरी समस्या सोडवण्यावर भाजपाने भर दिलेला आहे प्रभाग 15 मध्ये भाजपाचे नगरसेवक विकास कामांमधून नागरिकांना दिलासा देण्याचे काम करतील असे प्रतिपादन आमदार योगेश टिळेकर यांनी यावेळी बोलताना केले.निवडणुकीमध्ये दिलेल्या आश्वासनांची पूर्तता भविष्यात विकास कामांवर मधून करणार असून जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून 24 तास जनतेच्या सेवेकरिता आम्ही उपलब्ध असणार आहोत असे यावेळी बोलताना नगरसेविका नंदा आबनावे यांनी सांगितले.

आलेल्या मान्यवर पाहुण्यांचे स्वागत पुणेरी पगडी व शाल श्रीफळ देऊन नगरसेविका नंदा आबनावे,अनिल आबनावे अविनाश आबनावे,विशाल आबनावे यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास भंडारी यांनी तर आभार पुणे कॅंटोन्मेंट बँकेचे संचालक अनिल आबनावे यांनी मानले.




# मेक इन इंडिया स्वप्न पडद्यावर उलगडणार

- ■ ॲमेझॉन एमएक्स प्लेअरच्या वतीने मेड इन इंडिया – अ टायटन स्टोरी ट्रेलरचे अनावरण, टायटनचा न उलगडलेला वारसा
- ■ सत्य घटनांपासून प्रेरित, मेड इन इंडिया – टायटन कथेचे मोफत स्ट्रीम ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर 3 जूनपासून सुरू ~
- ■ Link - https://youtu.be/MPNexsJZycw

**मुंबई (दै. संध्या)**

काही कथा कंपन्यांची निर्मिती करतात, काही वारसा घडवतात आणि काही शांतपणे राष्ट्रांना जगाच्या नकाशावर नेऊन ठेवतात. ॲमेझॉन एमएक्स प्लेयर या भारतातील आघाडीच्या विनामूल्य, प्रीमियम, जाहिरात-समर्थित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवेने आज त्यांच्या आगामी मालिकेच्या 'मेड इन इंडिया- अ टायटन स्टोरी' या भारताच्या सर्वात प्रतिष्ठित ग्राहक ब्रँडपैकी एकाच्या मागे असलेल्या विलक्षण प्रवासाने प्रेरित अशा आकर्षक कथानकाच्या ट्रेलरचे अनावरण केले. विनय कामत यांच्या "टायटन-इंडियाज मोस्ट सक्सेसफुल कन्झ्युमर ब्रँड" या प्रशंसित पुस्तकावर आधारित या मालिकेत जेआरडी टाटाच्या भूमिकेत नसिरुद्दीन शाह, झेरक्सेस देसाईच्या भूमिकेत जिम सर्भ, त्याशिवाय वैभव तत्ववादी, नमिता दुबे, लक्षवीर सरन आणि कावेरी सेठ यांच्या प्रमुख भूमिका आहेत. ही मालिका मेक इन इंडिया उपक्रमाच्या भावनेशी सुसंगत असून तिचा उद्देश भारताला जागतिक रचना आणि उत्पादन केंद्रामध्ये रूपांतरित करण्याचा आहे. करण व्यास लिखित, रॉबी ग्रेवाल दिग्दर्शित आणि अलमाइटी मोशन पिक्चर्स निर्मित, ही सहा भागांची मालिका महत्त्वाकांक्षा, मार्गदर्शन आणि उत्कृष्टतेचा अथक पाठपुरावा यांचा शोध घेते, ज्याने एका अशक्य कल्पनेचे रूपांतर राष्ट्रीय वारशात केले.

पूर्व-उदारीकृत भारतात, देश आर्थिक आणि सामाजिक बदलाच्या उंबरठ्यावर उभा असताना, मेड इन इंडियाः अ टायटन स्टोरी'मध्ये दूरदर्शी उद्योजक झेरक्सेस देसाई यांच्या नजरेतून टायटनच्या उल्लेखनीय वाढीचा मागोवा घेतला आहे. ट्रेलरमध्ये महत्त्वाकांक्षा आणि अतूट विश्वासाने चाललेल्या प्रवासाची एक शक्तिशाली झलक दाखवण्यात आली आहे, जिथे भारतीय घड्याळांचा ब्रँड तयार करण्याची एक धाडसी कल्पना हळूहळू खूप मोठ्या गोष्टीत रूपांतरित होते. प्रतिकार वाढत असताना आणि अनिश्चितता वाढत असताना, झेरक्सेस देसाई आणि जेआरडी टाटा त्यांच्या विश्वासावर ठाम आहेत की भारत स्वतःचे काहीतरी निर्माण करू शकतो. घड्याळापासून सुरू झालेल्या कल्पनेतून असा वारसा मिळाला जो देशाच्या अस्मितेचा भाग बनला.

ही कथा प्रेक्षकांसमोर आणण्याबाबत आपले विचार मांडताना, ॲमेझॉन एमएक्स प्लेयरचे कंटेंट हेड अमोघ दुसाद म्हणाले, "मेड इन इंडियाः अ टायटन स्टोरी ही एका प्रतिष्ठित ब्रँडच्या प्रवासापेक्षा अधिक आहे, ती महत्त्वाकांक्षा तसेच उद्योजकतेची भावना प्रतिबिंबित करते ज्याने भारताच्या कथेतील एका निर्णायक अध्यायाला आकार दिला. आत्मनिर्भरता आणि स्वदेशी नवनिर्मितीला प्रोत्साहन देणाऱ्या 'मेक इन इंडिया' उपक्रमाप्रमाणेच, ही मालिका भारतातच जागतिक दर्जाचे उद्योग उभारणाऱ्या दूरदर्शी लोकांना सन्मानित करते. ॲमेझॉन एमएक्स प्लेअरमध्ये, भारतातील मूळ असलेल्या प्रीमियम, स्वदेशी कथांचे विजेतेपद आमच्या आशय दृष्टिकोनाच्या केंद्रस्थानी आहे. नसिरुद्दीन शाह आणि जिम सर्भ यांच्यासारख्या प्रतिभावंतांच्या उत्कृष्ट अभिनयासह, ही मालिका एका कथेत उल्लेखनीय सखोलता आणते जी पिढ्यांना प्रेरणा देत राहते. ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर विनामूल्य, देशभरातील प्रेक्षकांसाठी हा शक्तिशाली प्रवास आणताना आम्हाला आनंद होत आहे."

जेआरडी टाटांची भूमिका साकारणारे नसिरुद्दीन शाह यांनी सांगितले, "केवळ दूरदृष्टी या एका घटकामुळे जेआरडी टाटांबद्दल मला आकर्षण वाटले असं नव्हे, तर शांत आत्मविश्वासाने त्यांनी जनतेला स्वतःच्या कल्पनेपेक्षाही मोठी स्वप्ने पाहण्यास प्रेरित केले. त्यांच्याकडे क्षमता शोधण्याची आणि विश्वासाने ती जोपासण्याची विलक्षण क्षमता होती. हे वैशिष्ट्य अधिकाधिक दुर्मीळ होत चालले आहे असं वाटते. मेड इन इंडियाः अ टायटन स्टोरी ही कथा केवळ एक ब्रँड तयार करण्याबद्दल नसून यश अद्याप अनिश्चित असताना लोक, विश्वास आणि कल्पनेला पाठिंबा देण्याचे धैर्य याबद्दल आहे. जेआरडी टाटा यांचे चित्रण करणे आणि या सखोल, वारसासंपन्न कथेवर ॲमेझॉन एमएक्स प्लेयरसोबत काम करणे अत्यंत फायदेशीर ठरले. हा प्रवास प्रेक्षक कधी एकदा अनुभवतील याबद्दल मी उत्सुक आहे."

झेरक्सेस देसाईच्या भूमिकेबद्दल बोलताना, जिम सर्भ म्हणाला, "झेरक्सेस देसाई ही व्यक्तिरेखा मनाला भिडली. शांत तरी स्वभावाने बंडखोर, प्रवाहाच्या विरुद्ध आव्हानाला निडरपणे सामोरा जाणारा आणि अद्याप अस्तित्वात नसलेल्या गोष्टींची कल्पना करण्यास न घाबरणारी भूमिका माझ्या वाट्याला आली. मला मेड इन इंडियाबद्दल आवडणारी गोष्ट म्हणजे एक टायटन कथा की ती महत्त्वाकांक्षा आणि प्रमाणाबद्दल भाष्य करताना, तिच्या मुळाशी, ती सखोल मानवी आहे. ही कथा एखाद्या कल्पनेवर विश्वास ठेवण्यापेक्षा खूप आधी चिकाटी, अंतःप्रेरणेवर आधारित आहे. झेरक्सेस वठवताना ॲमेझॉन एमएक्स प्लेयरसोबत अशी पैलू असणारी व्यक्तिरेखा साकारणे आणि प्रेरणादायी कथेचा भाग होण्याची संधी मिळली यावर विश्वासच बसत नाही. आमचा हा प्रयत्न प्रेक्षक कधी एकदा पाहतील असं झाले आहे."

एक कल्पना, तिचा पाठलाग करताना येणारे चढ-उतार आणि एक स्वप्न; ज्याने पुढच्या पिढ्यांवर ठसा उमटवला, मेड इन इंडिया – अ टायटन स्टोरी दिनांक 3 जून 2026 रोजी प्रीमियरसाठी सज्ज आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### फ्लिपकार्टतर्फे विद्यार्थ्यांसाठी 'बॅक टू कॅम्पस 2026' विशेष विक्री उपक्रम

पुणे (दैनिक संध्या) : फ्लिपकार्टने विद्यार्थ्यांसाठी 'बॅक टू कॅम्पस २०२६' विशेष विक्री उपक्रम जाहीर केला असून, २२ मे ते २८ मेदरम्यान विविध तंत्रज्ञान साधनांवर आकर्षक सवलती दिल्या जाणार आहेत. या उपक्रमात वहनक्षम संगणक, फलक संगणक, ध्वनी उपकरणे, बुद्धिमान घड्याळे आणि परिधान करता येणाऱ्या बुद्धिमान साधनांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षण, सर्जनशीलता आणि दैनंदिन वापरासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता-सक्षम साधनांची मागणी वाढत असल्याने, ही साधने अधिक परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्यावर कंपनीने भर दिला आहे.या विक्री उपक्रमात आसुस, सॅमसंग, लेनोव्हो, मोटोरोला, एचपी, डेल, एसर, ॲपल, वनप्लस, सोनी, जेबीएल, बोट, नॉईज आणि रिअलमी आदी नामांकित कंपन्यांच्या उत्पादनांवर सवलती देण्यात येत आहेत. ॲपल मॅकबुक एअर एम५, सॅमसंग गॅलेक्सी बुक ६, आसुस विवोबुक १४, लेनोव्हो लीजन प्रो ५, वनप्लस पॅड ४ आणि एसर आयकोनिया टॅब ५जी यांसारखी नव्या पिढीची उपकरणेही या उपक्रमात उपलब्ध आहेत. फ्लिपकार्टच्या इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे उपाध्यक्ष सुजित अगाशे म्हणाले, "आजच्या कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित युगात तंत्रज्ञान हे विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी महत्त्वाचे साधन बनले आहे. 'बॅक टू कॅम्पस २०२६'च्या माध्यमातून उच्च क्षमतेची आधुनिक साधने अधिक सुलभ दरात उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे." विद्यार्थ्यांना 'फ्लिपकार्ट स्टुडंट्स क्लब'मध्ये नोंदणी करून अतिरिक्त लाभ मिळणार आहेत. पडताळणी केलेल्या विद्यार्थी ओळखपत्राच्या आधारे निवडक वहनक्षम संगणकांवर सहा हजार रुपयांपर्यंत अतिरिक्त सवलत मिळणार आहे. तसेच, सुलभ हप्ते योजना, विनाव्याज मासिक हप्ते आणि जुन्या उपकरणांच्या बदल्यात विशेष सवलतीही उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या उपक्रमासाठी कंपनीने विशेष जाहिरात मोहिमही सुरू केली आहे. "आकर्षक सवलतींसह आपली उपकरणे अद्ययावत करा आणि नव्या शैलीत महाविद्यालयीन जीवनात पुनरागमन करा," या संकल्पनेवर ही मोहीम आधारित आहे. फ्लिपकार्टच्या विपणन विभागाचे उपाध्यक्ष प्रतीक शेट्टी म्हणाले, "विद्यार्थ्यांच्या अनुभवांशी नाळ जोडणारी आणि त्यांना परवडणाऱ्या दरात आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देणारी ही मोहीम आहे. यामुळे तरुण ग्राहकांशी अधिक जवळीक निर्माण होण्यास मदत होईल."



### अमेझॉनतर्फे फायर टीव्ही स्टिक एचडी लॉन्च

पुणे (दैनिक संध्या) : अमेझॉनने भारतीय बाजारपेठेत नवी 'फायर टीव्ही स्टिक एचडी' सादर करत घरगुती मनोरंजन क्षेत्रातील स्पर्धा अधिक तीव्र केली आहे. आधीच्या पिढीच्या तुलनेत ही नवी साधनसामग्री सरासरी ३० टक्के अधिक वेगाने कार्य करत असल्याचा दावा कंपनीने केला असून ग्राहकांना अधिक जलद, अखंड आणि सुलभ चित्रप्रवाहाचा अनुभव देण्यावर भर देण्यात आला आहे. पूर्ण एचडी दर्जातील चित्रप्रवाह, अधिक स्थिर बिनतारी जाळे जोडणी, वेगवान प्रतिसाद क्षमता आणि नव्या स्वरूपातील वापर प्रणाली ही या उत्पादनाची प्रमुख वैशिष्ट्ये मानली जात आहेत. कंपनीच्या मते, ही आतापर्यंतची सर्वात सडपातळ आणि हलकी 'फायर टीव्ही स्टिक' असून ती थेट दूरचित्रवाणी संचाच्या 'यूएसबी' जोडणीद्वारे चालवता येते. त्यामुळे स्वतंत्र विद्युत जोडणी किंवा अतिरिक्त तारा वापरण्याची गरज राहत नाही. आकाराने लहान असल्याने ती प्रवासादरम्यान सहज बरोबर नेता येणार असून ग्राहकांना कुठेही त्यांच्या आवडत्या मालिका, चित्रपट किंवा थेट कार्यक्रमांचा आनंद घेता येणार आहे. नव्या प्रणालीमध्ये चित्रपट, मालिका, थेट कार्यक्रम आणि विनामूल्य सामग्रीसाठी स्वतंत्र विभाग देण्यात आले आहेत. त्यामुळे ग्राहकांना हवे असलेले मनोरंजन कमी वेळेत शोधणे शक्य होणार आहे. याशिवाय, घरातील वातानुकूलन यंत्रणा, पंखे, दिवे आणि इतर स्मार्ट उपकरणांचे नियंत्रणही या प्रणालीद्वारे करता येणार आहे. आवाजाद्वारे आदेश देण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली असून त्यामुळे कार्यक्रम शोधणे आणि सुरू करणे अधिक सोपे होणार आहे. अमेझॉनने यंदाच्या सुरुवातीला भारतात 'फायर टीव्ही'साठी नव्या स्वरूपातील भ्रमणध्वनी अनुप्रयोगही सादर केला होता. या माध्यमातून ग्राहकांना भ्रमणध्वनीवरूनच कार्यक्रम शोधणे, पाहण्याची यादी तयार करणे आणि दूरचित्रवाणीवर थेट कार्यक्रम सुरू करणे शक्य झाले आहे. मनोरंजनाबरोबरच खेळप्रेमी ग्राहकांनाही लक्षात घेऊन या साधनामध्ये मेघाधारित खेळांचा पर्याय देण्यात आला आहे. त्यामुळे स्वतंत्र खेळयंत्रांशिवाय विविध खेळांचा अनुभव घेता येणार आहे. अमेझॉनच्या 'फायर टीव्ही' विभागाच्या प्रमुख सयंतनी चौधरी म्हणाल्या, "ग्राहकांना अधिक वेगवान आणि प्रतिसादक्षम मनोरंजन अनुभव अपेक्षित असतो. चित्रफिती जलद सुरू होणे, कार्यक्रम सहज शोधता येणे आणि अडथळामुक्त चित्रप्रवाह मिळणे या गरजा लक्षात घेऊन आम्ही नवी 'फायर टीव्ही स्टिक एचडी' विकसित केली आहे. ही आमची आतापर्यंतची सर्वात सडपातळ आणि सोयीस्कर साधनसामग्री असून ती दूरचित्रवाणीच्या मागे सहज बसते. कार्यक्षमता, रचना आणि वापरातील सुलभता यांचा समतोल साधत भारतीय ग्राहकांसाठी हे उत्पादन सादर करताना आम्हाला आनंद होत आहे."

# रस्त्यात सापडलेले सोन्याचे मंगळसूत्र महिलेला केले परत



**सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव**

आजच्या काळात सोन्याचे भाव गगनाला भिडलेले असताना, रस्त्यात सापडलेले लाखो रुपयांचे मंगळसूत्र स्वतःहून परत करणाऱ्या श्री. वाघमारे यांच्या प्रामाणिकपणाचे आणि रुग्णाप्रती दाखवलेल्या संवेदनशीलतेबद्दल 'एस हॉस्पिटल'च्या संपूर्ण टीमचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

**मुंबई (दै. संध्या)**

आजच्या युगात जिथे प्रामाणिकपणा दुर्मिळ होत चालला आहे, तिथेच एका सुजाण नागरिकाच्या प्रामाणिकपणामुळे आणि 'एस हॉस्पिटल 'एरंडवणे येथील कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे एका महिलेचे हरवलेले लाखो रुपयांचा दागिना तिला सुखरूप परत मिळालाआहे. रस्त्यात सापडलेले अंदाजे १४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र संबंधित महिलेला परत करून समाजात अजूनही प्रामाणिकपणा जिवंत असल्याचा प्रत्यय आणून दिला आहे. मागील आठवड्यात एस हॉस्पिटलच्या बाहेरील रस्त्यावर एका महिला रूग्णाचे अंदाजे १४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र हरवले होते. यानंतर या महिलेने हॉस्पिटलमध्ये येऊन कर्मचाऱ्यांना याबद्दल सांगितले. हॉस्पिटल स्टाफने वेळ न दवडता त्या दिवशी तिथे आलेले रुग्ण, नातेवाईक आणि व्हिजिटर्स यांच्याकडे चौकशी सुरू केली. दरम्यान, त्या दिवशी हॉस्पिटलमध्ये व्हिजिटसाठी आलेले मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह श्री. गणेश वाघमारे यांना रस्त्याने येताना हे मंगळसूत्र सापडले होते. हॉस्पिटलमध्ये याबाबत चौकशी सुरू असल्याचे त्यांना त्यांचे मित्र अजय कापसे यांचेकडून समजताच, त्यांनी हॉस्पिटल प्रशासनाला फोन करून दागिना आपल्याकडे सुरक्षित असल्याचे कळवले.

यानंतर हॉस्पिटल प्रशासनाने संबंधित महिला रुग्णाच्या पतीला बोलावून घेतले आणि सर्वांसमक्ष सोन्याचे मंगळसूत्र त्यांना सुखरूप परत केले.

# दुर्मिळ चयापचय विकाराचे निदान व उपचार

**मुंबई (दै. संध्या)**

आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमधील बहुविभागीय तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने चयापचय विकार या दुर्मिळ आणि गुंतागुंतीच्या आजाराने ग्रस्त असलेल्या एका बालरुग्णावर यशस्वी उपचार केले. हा दुर्मिळ आजार गिलियन-बॅरे सिंड्रोम (जीबीएस) सारखा दिसत होता. यामुळे मज्जासंस्थेशी संबंधित (न्यूरोलॉजिकल) लक्षणांमागील लपलेली कारणे शोधण्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. पूर्णपणे निरोगी आणि सामान्य विकास झालेल्या ४ वर्षे ९ महिन्यांच्या एका मुलामध्ये काही दिवसांपूर्वी ताप, खोकला आणि सर्दीची लक्षणे दिसून आली. त्यानंतर अल्पकाळ झटके आल्यानंतर त्याला आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमध्ये आणण्यात आले. रुग्णालयात दाखल होताना तो शुद्धीत होता. मात्र डॉक्टरांनी त्याचा रक्तदाब अत्यंत जास्त असल्याचे आणि शरीरातील प्रतिक्षिप्त क्रिया अनुपस्थित असल्याचे लक्षात घेतले. त्यानंतर त्याला बाल अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. पुढील २४ तासांत त्या मुलामध्ये हात-पायांचा अशक्तपणा वाढला आणि श्वास घेण्यास अडचण निर्माण झाली. त्यामुळे अखेरीस त्याला व्हेंटिलेटरची गरज भासली. तपासण्यांमधून त्याला गिलियन-बॅरे सिंड्रोम असल्याचे संकेत मिळाले आणि तातडीने उपचार सुरू करण्यात आले. मुलाला तब्बल ७५ दिवस यांत्रिक श्वसन सहाय्य द्यावे लागले.


# "कुठल्याही लहान मुलाला भावनिक त्रास सहन करावा लागू नये."

**मुंबई (दै. संध्या)**

झी टीव्हीवरील 'जगद्धात्री' ह्या मालिकेने आपल्या गहन नाट्यमय घडामोडी, भावनिक वळणे आणि मनाची पकड घेणाऱ्या कथानकासह प्रेक्षकांना आपल्या टीव्ही स्क्रीन्सना खिळवून ठेवले आहे. सध्या या मालिकेत गूढ आणि कौटुंबिक संघर्षांसह प्रेक्षकांचे मनोरंजन सुरू असताना माया (सयंतानी घोष) आणि शरद (अजय सिंग चौधरी) यांच्या कथानकाने विशेषकरून प्रेक्षकांच्या मनाला भावनिकरित्या स्पर्श केला आहे. त्यांच्या जटिल गुंतागुंतीच्या नातेसंबंधांमुळे आणि त्यांच्या वेगळे राहण्यामुळे त्यांची मुलगी गुंजन (परी भानुशाली) हिच्यावर त्याचा खोल परिणाम होत आहे. या कथेद्वारे अनेक कुटुंबांना जोडणारी एक नाजूक आणि भावनिक वास्तविकता पुढे येत आहे. या भावनिक प्रसंगातून पालकांमधील गैरसमज आणि वाद मुलांवर शांतपणे कसा परिणाम करतात हे सयंतानी घोष अधोरेखित करत आहे. विशेषतः स्वतःच्या भावना मोकळेपणाने व्यक्त करू न शकणाऱ्या मुलांवर याचा अधिक खोल परिणाम होऊ शकतो याकडे ती लक्ष वेधत आहे. अलीकडील भागांमध्ये दाखवल्याप्रमाणे, माया आणि शरद हे अधिकृतपणे घटस्फोटित नसले तरी वेगळे राहतात आणि त्यांच्या या भावनिक दुराव्याचा त्यांची मुलगी गुंजनवर खोल परिणाम होत आहे. गुंजन ही एक विशेष मुलगी आहे, जिला बोलता आणि ऐकू येत नाही, त्यामुळे तिच्या मनातील भावना व्यक्त करणे तिच्यासाठी आणखी कठीण होते. गुंजनच्या या स्थितीसाठी माया काही प्रमाणात शरदला जबाबदार धरते, त्यामुळे त्यांच्या नात्यात दुरावा निर्माण झाला आहे. मायासोबत असताना गुंजनला तिच्या वडिलांची आठवण येते, तर शरदसोबत असताना ती आईच्या मायेची उणीव भासते.

# विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडमध्ये चमकदार कामगिरी

**पुणे (दै. संध्या)**



विज्ञान ऑलिम्पियाड फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या जगातील सर्वात मोठ्या ऑलिम्पियाड स्पर्धांपैकी एक असलेल्या एसओएफ ऑलिम्पियाड २०२५-२६ मध्ये पुण्यातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. विविध विषयांच्या स्पर्धांमध्ये विशेष प्रावीण्य मिळवत विद्यार्थ्यांनी शहराचा नावलौकिक वाढविला आहे.

भारती विद्यापीठ रवींद्रनाथ टागोर उत्कृष्टता विद्यालयातील इयत्ता दहावीचा विद्यार्थी आर्य वैभव कुलकर्णी याने आंतरराष्ट्रीय इंग्रजी ऑलिम्पियाडमध्ये विशेष प्रावीण्य मिळवले. तसेच एसएनबीपी आंतरराष्ट्रीय विद्यालयातील इयत्ता अकरावीचा विद्यार्थी देव सक्सेना याने राष्ट्रीय विज्ञान ऑलिम्पियाडमध्ये विशेष यश संपादन केले.

विबग्योर उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता सहावीचा विद्यार्थी अर्जुन डोंगरवार याने आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडमध्ये विशेष प्रावीण्य मिळवले, तर अक्षरा आंतरराष्ट्रीय विद्यालयातील इयत्ता आठवीचा विद्यार्थी अरमान गुहा याने राष्ट्रीय विज्ञान ऑलिम्पियाडमध्ये विशेष यश मिळवले. सर्व विद्यार्थ्यांना सुवर्णपदके, प्रमाणपत्रे आणि विशेष प्रावीण्य गौरवपत्र प्रदान करण्यात आले. यंदाच्या एसओएफ ऑलिम्पियाड स्पर्धांमध्ये पुण्यातील तीन लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे त्यांच्या शाळांबरोबरच संपूर्ण पुणे शहराचा गौरव वाढला असून इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत आहे.

नवी दिल्ली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्रात आयोजित २८ व्या एसओएफ आंतरराष्ट्रीय वार्षिक पुरस्कार सोहळ्यात या विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विजय बिश्नोई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच इस्रोचे माजी प्राध्यापक वाय. एस. राजन, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचे सचिव हिमांशू गुप्ता आणि न्यूरो व मणक्याच्या आजारांवरील संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गुप्ता यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या यशाबद्दल विज्ञान ऑलिम्पियाड फाउंडेशनचे संस्थापक व संचालक महाबीर सिंग म्हणाले, "एसओएफ ऑलिम्पियाड स्पर्धा विद्यार्थ्यांना उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रेरित करत असून त्यांची विचारशक्ती आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करण्यास मदत करत आहेत. विद्यार्थ्यांचे यश हे त्यांच्या मेहनतीचे, समर्पणाचे आणि शाळांनी दिलेल्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे प्रतीक आहे."

विज्ञान ऑलिम्पियाड फाउंडेशन ही संस्था विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती, विश्लेषणात्मक विचार आणि अभ्यासातील प्रावीण्य वाढविण्यासाठी विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाड स्पर्धांचे आयोजन करत असते.

# एमजी मॅजेस्टर 4x2 ऑटोमॅटिक टॉप ट्रिम ₹40.99 लाख

**मुंबई (दै. संध्या)**

JSW MG मोटर इंडियाने आज बहुप्रतिक्षित MG MAJESTOR, भारतातील पहिली D+ SUV लॉन्च करण्याची घोषणा केली. ज्या ग्राहकांना त्यांच्या पुढील SUV कडून अधिक अपेक्षा आहेत, त्यांच्यासाठी डिझाइन केलेली MAJESTOR, रस्त्यावर प्रभावी उपस्थिती, प्रगत अभियांत्रिकी आणि उत्कृष्ट सर्व-भूभाग क्षमता यांचा मिलाफ आहे.

एमजी मॅजेस्टर 4x2 ऑटोमॅटिक टॉप ट्रिम INR 40.99 लाख (एक्स-शोरूम किंमत) (६ आणि ७-सीटर)एमजी मॅजेस्टर 4x4 ऑटोमॅटिक टॉप ट्रिम INR 44.99 लाख (एक्स-शोरूम किंमत) रुपयांना लॉन्च करण्यात

आली आहे. या लॉन्चवर भाष्य करताना, जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक, अनुराग मेहरोत्रा म्हणाले, "एमजी



मॅजेस्टर ही भारतातील पहिली D+ एसयूव्ही असून, ती आमच्या पोर्टफोलिओमध्ये एक मोठे परिवर्तन घडवते. ही गाडी उत्कृष्ट कामगिरी, प्रीमियम आराम, प्रगत तंत्रज्ञान आणि अतुलनीय विश्वासार्हता यांचा शक्तिशाली मिलाफ सादर करते. तिच्या अतुलनीय आकारमानामुळे, ऑफ-रोडवरील प्रभुत्वामुळे आणि अनेक सेगमेंट-फर्स्ट वैशिष्ट्यांमुळे, मॅजेस्टर नवीन मापदंड स्थापित करते आणि भारतीय एसयूव्ही क्षेत्रात एक खरोखरच वेगळे मूल्य प्रदान करते."

मॅजेस्टरची रचना खऱ्या एसयूव्ही कामगिरीसाठी केली आहे. तिचे ट्विन-टर्बो डिझेल इंजिन 2WD आणि प्रगत 4WD या दोन्ही प्रकारांमध्ये 8-स्पीड ऑटोमॅटिक ट्रान्समिशनसह जोडलेले असून, ते आपल्या वर्गात सर्वोत्तम 215.5 PS आणि 478.5 Nm टॉर्क देते. इंटेलिजेंट 4WD सिस्टीममध्ये 10 ऑफ-रोड मोड्स आहेत, जे दैनंदिन कार्यक्षमता आणि मजबूत क्षमतेमध्ये सहजपणे संतुलन साधतात. ऑटो मोडमध्ये, सामान्य परिस्थितीत ते 2WD मध्ये चालते आणि ट्रॅक्शन कमी झाल्यावर त्वरित 4WD मध्ये शिफ्ट होते—जे पाऊस, बर्फ किंवा निसरड्या पृष्ठभागांसाठी उत्तम आहे.

ऑफ-रोड क्षमता अधिक मजबूत करण्यासाठी, मॅजेस्टर हे त्याच्या सेगमेंटमधील पहिले वाहन आहे ज्यात फ्रंट, रिअर आणि सेंटर डिफरेंशियल लॉक्स आहेत, ज्यामुळे चाकांनी ट्रॅक्शन गमावले तरीही गाडी बाहेर काढता येते. क्रॉल कंट्रोल मोड, 219 मिमी ग्राउंड क्लिअरन्स** आणि 810 मिमी पाण्यातून जाण्याच्या क्षमतेसह, हे वाहन अत्यंत खडतर भूभागावरही ताकद आणि आत्मविश्वासाने मात करण्यासाठी बनवले आहे.

2950 मिमीच्या मोठ्या व्हीलबेससह, मॅजेस्टरची आकर्षक लांबी 5046 मिमी, रुंदी 2016 मिमी आणि उंची 1870 मिमी आहे. त्याची मोझॅक मॅट्रिक्स ग्रिल, ड्रॅगन आईज डीआरएल, ट्राय-बीम हेडलॅम्प्स, कनेक्टेड एलईडी टेल लॅम्प्स, उंच हूड लाइन आणि 19-इंच अलॉय व्हील्स याला एक आकर्षक पण परिष्कृत लुक देतात. आतमध्ये, केबिन काळ्या रंगाच्या थीमवर आधारित आरामदायी अनुभव देते, ज्यामध्ये मऊ लेदर, व्हेंटिलेटेड आणि मसाजिंग सीट्स (१२-वे ड्रायव्हर, ८-वे पॅसेंजर), एक पॅनोरॅमिक सनरूफ, ६४-रंगांची ॲम्बियंट लायटिंग आणि थ्री-झोन एसी यांचा समावेश आहे. ६- किंवा ७-सीटर कॉन्फिगरेशनमध्ये उपलब्ध असलेल्या या गाडीमध्ये ड्युअल १२.३-इंच डिस्प्ले, वायरलेस अँड्रॉइड ऑटो/ॲपल कारप्ले, १२ जेबीएल सराउंड-साउंड स्पीकर्स, ड्युअल वायरलेस चार्जर्स, एक २२०V आउटलेट आणि तंत्रज्ञान-स्मार्ट-कनेक्टेड ७५+ फीचर्स आहेत, जे तंत्रज्ञान-स्मार्ट ड्रायव्हिंगचा अनुभव देतात.

सुरक्षितता हा मॅजेस्टरचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. लेव्हल २ एडीएएसने सुसज्ज असलेली ही गाडी असिस्टेड स्टीयरिंग, ब्रेकिंग आणि ॲक्सेलरेशनची सुविधा देते. अतिरिक्त वैशिष्ट्यांमध्ये ३६०° एचडी कॅमेरा, एबीएस, ईबीडी, टीसीएस आणि आरएमआय सह ईएसपी यांचा समावेश आहे, जे प्रत्येक ड्रायव्हिंगमध्ये आत्मविश्वास आणि नियंत्रण सुनिश्चित करतात. मॅजेस्टर पर्ल व्हाइट, काँक्रीट ग्रे, मेटल ब्लॅक आणि मेटल ॲश या चार रंगांच्या पर्यायांमध्ये उपलब्ध आहे. एमजी मॅजेस्टर 'एमजी शील्ड' नावाच्या एका अनोख्या कार मालकी कार्यक्रमासह येते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ओतूर ग्रामपंचायतचे भ्रष्ट अधिकारी करताहेत सरकारी पैशांची उधळपट्टी

ओतूर (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील सर्वात मोठी महसूल असणारी ग्रामपंचायत म्हणजे ओतूर ग्रामपंचायत या ग्रामपंचायत मध्ये असलेले ग्रामविकास अधिकारी हे हमेशा याना त्या कारणामुळे चर्चेत राहिले. सराफआळी येथील निकृष्ट दर्जाच्या रस्ता तयार करून ग्रामपंचायतने भ्रष्टाचाराचा एक उत्कृष्ट नमुना गावकऱ्यांना दाखवला. या प्रकरणाची चौकशी विस्तार अधिकारी संजय जंजाळ यांनी करून संबंधित अधिकाऱ्यावर व संबंधित ठेकेदार कारवाई केली नाही. भ्रष्टाचार उघडकीस आणणाऱ्या पत्रकार नयन डुंबरे यांना वेळोवेळी दमबाजी व धमकीला सामोरे जावे लागले. अशा भ्रष्ट अधिकाऱ्यावर गटविकास अधिकारी यांच्याकडे पत्रकार नयन डुंबरे यांनी लेखी तक्रार करून देखील कारवाई करण्यात आली नाही. अशा भ्रष्ट ग्रामविकास अधिकाऱ्यावर मेहरबानी का केली जाते. हा अधिकारी कोणाच्या छत्र छायेखाली भ्रष्टाचार करून देखील पदावर कायम आहे. हे मात्र ओतूरकरांना न समजणारे कोडे आहे. या प्रकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पर्यंत आवाज उठवणाऱ्या सामान्य नागरिकांचा आवाज दाबण्याचे काम हे अधिकारी करत आहेत सदर प्रकरणात ग्रामविकास अधिकारी, विस्तार अधकारी,गट विकास अधिकारी यांच्यावर कारवाई झाली नाही तर राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना निवेदन देऊन येणाऱ्या काही दिवसात पत्रकार नयन डुंबरे हे ग्रामपंचायत कार्यालय ओतूर या ठिकाणी आमरण उपोषण करणार असल्याचे स्पष्ट केले आहे. तरी संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी व केलेला भ्रष्टाचार संबंधित अधिकाऱ्याकडून शासनाने वसूल करावा अशी मुख्य मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे.

### कॅम्प एज्यु कॉलेजमध्ये मोफत इलेक्ट्रिक व्हेइकल सर्विस टेक्निशियन कोर्स सुरु

पुणे (दैनिक संध्या) : कलेक्टिव्ह गुड फौंडेशन व मिटकॉन फोरम फॉर सोशल डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने कॅम्प एज्युकेशन सोसायटी (निगडी) येथे मोफत ॲडव्हान्स इलेक्ट्रिक व्हेइकल सर्विस टेक्निशियन कोर्स सुरू होत आहे. पेट्रोल व डिझेल वाहनांच्या तुलनेत इलेक्ट्रिक वाहनांचा वापर दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढत असून भविष्यात इलेक्ट्रिक वाहन उद्योगामध्ये कुशल तंत्रज्ञांची मोठ्या प्रमाणावर गरज निर्माण होणार आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यासाठी कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, प्राधिकरण निगडी, पुणे येथे "ॲडव्हान्स इलेक्ट्रिक व्हेइकल सर्विस टेक्निशियन" हा अल्पकालीन कौशल्य विकास कोर्स सुरू करण्यात आला आहे. या कोर्समध्ये विद्यार्थ्यांना इलेक्ट्रिक दुचाकी वाहनांची रचना, बॅटरी व्यवस्थापन प्रणाली (BMS), मोटर कंट्रोलर, चार्जिंग सिस्टम, फॉल्ट डायग्नोसिस, मेंटेनन्स, सेफ्टी प्रॅक्टिसेस, वायरिंग, टेस्टिंग व रिपेअरिंग यांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने उद्योगाभिमुख प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रम CSR च्या अंतर्गत राबवला जाणार असून इच्छुक लाभार्थींना प्रशिक्षण पूर्ण करण्याकरिता आर्थिक सहायता दिली जाणार आहे. या प्रशिक्षणासाठी पात्रता किमान आय टी आय/डिप्लोमा उत्तीर्ण, वय १८ ते ३० वर्षे अशी आहे. मुले व मुली दोघांनाही प्रवेश उपलब्ध आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार तसेच ई-व्हेइकल सर्विस सेंटर सुरू करण्याच्या संधी उपलब्ध होणार आहेत. आजच्या काळात इलेक्ट्रिक वाहन क्षेत्र झपाट्याने विकसित होत असून या क्षेत्रामध्ये प्रशिक्षित तंत्रज्ञांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. शासनाच्या हरित ऊर्जा व प्रदूषणमुक्त वाहतूक धोरणामुळे इलेक्ट्रिक वाहन उद्योगाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या आधुनिक कौशल्याधारित कोर्सचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे कार्याध्यक्ष वालचंद संचेती यांनी केले आहे. प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, प्राधिकरण निगडी, पुणे ९९६०२८५८८३/ ७३८५४८७७२७ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

### जांभूळवाडी-कोळेवाडीत भूमाफियांचा उच्छाद

आंबेगाव (दैनिक संध्या) : घर-घर करत जेसीबी आणि पोकलॅन येतात आणि डोंगरांच्या फुफ्फुसांवर घाव घालतात. त्यात निसर्गाचा मात्र जीव जातो. अशी गंभीर स्थिती दक्षिण पुणे परिसरातील जांभूळवाडी-कोळेवाडी आणि आंबेगाव खुर्द परिसरात निर्माण झाली आहे. हिरवाईने नटलेले आणि नैसर्गिक सौंदर्य लाभलेले जांभूळवाडी-कोळेवाडीचे डोंगर आज भूमाफियांच्या निर्दयी पंजात सापडले आहेत. परिसरात अवैध उत्खनन, डोंगर फोड, भराव टाकून सपाटीकरण आणि वृक्षतोड झपाट्याने सुरू असल्याने संपूर्ण परिसराचे विद्रूपीकरण सुरू आहे. जेसीबी आणि पोकलॅनच्या गर्जनेत निसर्ग अक्षरशः नष्ट होत असताना महसूल विभागाचे हेतूपुरस्सर मौन मात्र संशयास्पद असल्याचे दिसत आहे. आंबेगाव खुर्द परिसरात, त्याचबरोबर स्वामी नारायण टेकडीवरदेखील मोठ्या प्रमाणावर डोंगराची लचकेतोड होत असल्याचे धक्कादायक चित्र आहे.

# लष्करी हेलिकॉप्टरच्या घिरट्यांवरून अफवा पसरवू नका

**सासवड पोलिसांचे आवाहन**

सासवड (दै. संध्या)

मागील काही दिवसांपासून पुरंदर तालुक्यात रात्रीच्या वेळी आकाशात हेलिकॉप्टर घिरट्या घालत असल्याच्या चर्चा आणि समाजमाध्यमांवरील संदेशांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीती व संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, नागरिकांनी कोणत्याही प्रकारची भीती बाळगू नये, हे हेलिकॉप्टर लष्कराच्या नियमित रात्रीच्या प्रशिक्षणाचा भाग आहे, असे स्पष्टीकरण सासवड पोलीस ठाण्याच्या वतीने देण्यात आले आहे. गेल्या काही रात्रींपासून पुरंदर तालुक्यातील विविध भागांतून आकाशात हेलिकॉप्टरचे आवाज येत असल्याने आणि ते घिरट्या घालत



असल्याचे दिसल्याने नागरिकांमध्ये विविध तर्कवितर्क लढवले जात होते. सोशल मीडियावरही याबाबत उलटसुलट संदेश प्रसारित होत असल्याने नागरिकांमधील चिंता वाढली होती. या सर्व पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने तातडीने या प्रकरणाची दखल घेतली. संबंधित यंत्रणा आणि लष्करी प्रशासनाकडून याबाबतची संपूर्ण खात्री करण्यात आली आहे. आकाशात दिसणारे हेलिकॉप्टर हे लष्कराच्या नियमित रात्रीच्या सरावाचा आणि प्रशिक्षणाचा हिस्सा आहे. हा एक शासकीय आणि सुरक्षित प्रक्रियेचा भाग असल्याने तालुक्यामध्ये कोणत्याही प्रकारचा धोका अथवा संशयास्पद हालचाल नाही. नागरिकांनी समाजमाध्यमांवर येणाऱ्या कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि घाबरून जाऊ नये असे आवाहन सासवड पोलीस ठाण्याच्या वतीने करण्यात आले आहे.

## पुणे–सोलापूर महामार्गावर भीषण अपघातात तरुणाचा मृत्यू

लोणी काळभोर (दै. संध्या)

पुणे–सोलापूर महामार्गावर भरधाव वेगातील कारने जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एका अनोळखी तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी लोणी काळभोर पोलिसांनी कारचालकाविरोधात गुन्हा दाखल केला असून, मृत अनोळखी इसमाची ओळख पटविण्याचे आव्हान आता पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार याप्रकरणी संतोष भिमराव राठोड (वय ४१, रा. वाकड, पुणे) या कारचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार अतुल अमृत रायबोले (वय ४०) यांनी सरकारतर्फे लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ मे रोजी दुपारी पावणेदोनच्या सुमारास डायल ११२ वर एका नागरिकाने फोन करून लोणी काळभोर ग्रामपंचायत हद्दीतील सेल पेट्रोलपंपाजवळील बोरकरवस्ती परिसरात अपघात झाल्याची माहिती दिली. त्यानंतर पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी अतुल रायबोले आणि ए. व्ही. पवार तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी सोलापूर–पुणे मार्गाच्या बाजूला एफएस टिंबर दुकानासमोर अंदाजे ३० वर्षीय अनोळखी तरुण रक्ताच्या थारोळ्यात बेशुद्ध अवस्थेत पडलेला आढळून आला. त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. जवळच मारुती सुझुकी कंपनीची ईर्टिगा कार क्रमांक एमएच १४ केएन ६९६८ उभी होती. कारच्या समोरील भागाचे मोठे नुकसान झालेले होते.

## जीव वाचवायला गेलेल्या सर्पमित्राला सर्पदंश

लोणी काळभोर (दै. संध्या)

हवेली तालुक्यातील थेऊर येथील २१ वर्षीय तरुण सर्पमित्राचा साप पकडत असताना साप चावून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सदर घटना कोलवडी (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीत सोमवार (२५ मे) रोजी सायंकाळी घडली आहे. या घटनेत दिपक संतोष जाधव (वय २१, रा. सिद्धेश्वर मंदिर रोड, काळे वस्ती, थेऊर. ता. हवेली) या सर्पमित्राचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिपक जाधव हे गेल्या अनेक दिवसांपासून परिसरातील विषारी व बिनविषारी साप विनामोबदला पकडत होता. तो एक सक्रिय गोरक्षक आणि सर्पमित्र म्हणून ओळखला जात होता. कुठेही कोणाच्या घरात किंवा शेतात साप निघाल्यास नागरिक दिपकला फोन करत असत आणि तो देखील जीवाची पर्वा न करता तातडीने तिथे पोहोचून सापांना सुखरूप पकडून निसर्गाच्या सानिध्यात सोडत होता. सोमवारी सायंकाळी कोलवडी ग्रामपंचायत हद्दीत साप निघाल्याची माहिती दिपक याला मिळाली होती. त्यानुसार तो नेहमीप्रमाणे सापाला जीवदान देण्यासाठी तेथे पोहोचला. शोधमोहीम सुरू असताना, एका ठिकाणी पडलेल्या पत्र्यांच्या ढिगाऱ्याखाली साप लपल्याचा त्याला संशय आला. दिपक याने पत्र्याच्या खाली हात घातला असता यावेळी पत्र्याखाली दबा धरून बसलेल्या सापाने त्याच्या हाताला दंश केला.

## आळंदीत 'श्रीरामकथा मानस पसायदान' सोहळ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

**रवींद्र पाठक यांच्या भावपूर्ण निरूपणाने भक्तिमय वातावरण**

आळंदी (दै. संध्या)

चैतन्य गोशाळा ट्रस्ट, यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'श्रीरामकथा मानस पसायदान' या नऊ दिवसीय आध्यात्मिक सोहळ्याला भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. फुटवाले धर्मशाळा, आळंदी येथे सुरू असलेल्या या कार्यक्रमात दररोज मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहत असून परिसर भक्तिरसाने भारावून गेला आहे. कार्यक्रमामध्ये संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पवित्र पसायदानाचे सामूहिक पठण करण्यात येत असून, त्यानंतर कथा निरुपणकार श्री. रवींद्र पाठक यांच्या ओजस्वी व भावपूर्ण वाणीतील श्रीरामकथेचे निरूपण




भाविकांना मंत्रमुग्ध करत आहे. रामायणातील विविध प्रसंगांचे मनातला आध्यात्मिक, सामाजिक आणि संस्कारमूल्यांशी जोडलेले विवेचन उपस्थितांच्या मनाला स्पर्शून जात आहे. विशेष म्हणजे, श्रीरामकथेबरोबरच माऊलींच्या पसायदानाचेही सखोल निरूपण करण्यात येत आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांनी विश्वकल्याणासाठी व्यक्त केलेल्या पसायदानातील संदेश, मानवतेचे तत्त्वज्ञान, समाजातील सद्भावना आणि भक्तीमार्गाचे महत्त्व यांचे अत्यंत समर्पक विवेचन रवींद्र पाठक करत असल्याने भाविकांना अध्यात्मिक आनंदाची अनुभूती मिळत आहे. सद्गुरु श्री. ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर यांच्या कृपाआशीर्वादाने आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात नामस्मरण, भक्ती आणि अध्यात्माचा सुंदर संगम अनुभवायला मिळत आहे. सकाळ व सायंकाळच्या सत्रांमध्ये भाविकांची मोठी उपस्थिती पाहायला मिळत असून संपूर्ण परिसर रामनामाच्या गजराने दुमदुमून जात आहे. हा आध्यात्मिक सोहळा दि. ३१ मे २०२६ पर्यंत सुरू राहणार असून, अधिकाधिक भाविकांनी उपस्थित राहून आध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या संकेत वाघमारे यांनी केले आहे.

# शिवरस्ता खुला करण्याच्या हालचालींना वेग




कोरेगावमुळ (दै. संध्या)

पूर्व हवेली तालुक्यातील महत्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या साष्टे-कोलवडी-केसनंद-तळेरानवाडी-आव्हाळवाडी येथील शिवरस्ता खुला करण्याच्या प्रक्रियेला प्रशासनाच्या वतीने वेग आला असून, यासंदर्भात हवेली तालुक्याचे भूमी अभिलेख खात्याचे उपअधीक्षक कार्यालयाकडून नोटीस जारी करण्यात आली आहे. अशी माहिती जिल्हा परिषद सदस्य कोमल संदेश आव्हाळे,कोलवडी-साष्टे ग्रामपंचायतीचे आदर्श सरपंच विनायक गायकवाड यांनी दिली. हवेलीचे भूमी अभिलेखचे उपअधीक्षक यांनी लोणी काळभोरचे अपर तहसीलदार यांना पाठविलेल्या पत्रानुसार, साष्टे-कोलवडी, केसनंद-तळेरानवाडी-आव्हाळवाडी हा शिवरस्ता खुला करण्याची कार्यवाही दिनांक ३ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून करण्यात येणार आहे.यावेळी संबंधित गावचे मंडळ अधिकारी,ग्रामसेवक अधिकारी,ग्रामपंचायत प्रतिनिधी तसेच शिवरस्ता लगतचे शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित राहणार आहेत. लोणी काळभोर तहसील कार्यालय यांच्या आदेशानुसार ही कार्यवाही राबविण्यात येत असून, शिवरस्ता खुला करण्यासाठी आवश्यक सूचना व समन्वय साधण्याचे निर्देश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. सदर रस्ता खुला झाल्यास परिसरातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार असून,शेतीमाल वाहतूक, शेतात ये-जा तसेच कृषी कामांसाठी मोठी सोय निर्माण होणार आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या मार्गाच्या प्रश्नामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र आता प्रशासनाच्या पुढाकारामुळे हा प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच या शिवरस्ता खुला करण्याच्या कामामध्ये जिल्हा परिषद सदस्य कोमल संदेश आव्हाळे, सुरेखा रमेश हरगुडे, कोलवडी-साष्टे गावचे आदर्श सरपंच विनायक गायकवाड,केसनंदचे प्रशासक सरपंच सरपंच विशाल हरगुडे, यांचे मोलाचे योगदान असल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

स्थानिक पातळीवर सातत्याने पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केल्याचे नागरिकांनी सांगितले. आव्हाळवाडी - मांजरी खुर्द - तळेरानवाडी - कोलवडी - साष्टे - वाडेबोल्हाई हा शिवरस्ता लवकरात लवकर खुला करण्यात यावा याबाबतचे निवेदन अपर तहसीलदार तृप्ती कोलते यांना जिल्हा परिषद सदस्य कोमल संदेश आव्हाळे,सुरेखा रमेश हरगुडे, कोलवडी-साष्टे गावचे आदर्श सरपंच विनायक गायकवाड, केसनंदचे प्रशासक सरपंच सरपंच विशाल हरगुडे यांच्या वतीने देण्यात आले आहे. या निर्णयामुळे ग्रामस्थ व शेतकरी वर्गामध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, लवकरात लवकर रस्ता खुला व्हावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## नवी इमारत फ्लेक्सबाजी व फळ विक्रेत्यांच्या अतिक्रमणाने विद्रूप

उरुळी कांचन (दै. संध्या)

उरुळी कांचन ग्रामपंचायत कार्यालयाची नवीन इमारत अडकली फ्लेक्सच्या अन फळ विक्रेत्यांच्या अतिक्रमणाच्या विळख्यात ! उरुळी कांचन ग्रामपंचायतची स्थापना १९६० साली झाली. त्यावेळी ही ग्रामपंचायत परिसरातील पाच सहा गावांची मिळून ग्रुप ग्रामपंचायत होती.ग्रुप ग्रामपंचायतचा कारभार हाकण्यासाठी त्यावेळी बांधलेली इमारत तत्कालीन कारभाराच्या दृष्टीने मध्यवर्ती आणि योग्य अशीच होती. हळूहळू उरुळी कांचन गावाचे रूपांतर वाढत्या नागरिकरणाने पुण्याजवळील उपनगरामध्ये होत गेले.जुनी कार्यालय इमारत कामाच्या व्यापाच्या दृष्टीने अपुरी पडू लागल्याने,महतप्रयासाने व कोर्ट कचेऱ्यांच्या कचट्यातून तावुन सुलाखुन निघत,अनेक अडथळ्यांची शर्यत पार करून मागच्या वर्षीपर्यंत सुमारे ४ कोटी रुपये खर्च करून बांधकाम पूर्ण झालेल्या भव्य दिव्य व गावाच्या वैभवात भर टाकणाऱ्या नव्या कार्यालयीन इमारतीचे उदघाटन देशाचे जेष्ठ नेते शरद पवार यांच्या शुभहस्ते ३१ ऑगस्ट २०२५ रोजी झाले व गाव कारभार या इमारतीमधून सुरू झाला. मात्र सध्या गावाचे सौंदर्य वाढवणाऱ्या या भव्य इमारतीला नव्या युगातील फ्लेक्स बाजीने घेरले असून वाढदिवस शुभेच्छा,अमुक पदी निवड झाली म्हणून अभिनंदन या विषयांच्या भल्या मोठ्या फ्लेक्स बाजीने,ते पण इमारतीच्या सिमाभिंतीच्या लोखंडी जाळ्यांचा आधार घेवून लटकवल्याने ही सुसज्ज इमारत रस्त्यावरून सहजासहजी दिसत तर नाहीच पण विद्रूप मात्र झाली आहे. तसेच या इमारतीच्या शेजारी मुख्य रस्त्याच्या बाजूने गावात ग्रामपंचायतीमध्ये व अन्यत्र कामकाजासाठी येणाऱ्या नागरिकांना,जेष्ठांना बसण्यासाठी विट बांधकामाचे कट्टे बांधून सोय निर्माण केली होती.

# किल्ले रायगडाच्या संवर्धन आणि विकासाच्या नावाखाली अनागोंदी

**रायगड विकास प्राधिकरण बरखास्तीची मागणी**

पुणे (दै. संध्या)

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी आणि हिंदुस्थानच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या किल्ले रायगडाच्या संवर्धन आणि विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत आहे. गेल्या ९ वर्षांत सुमारे ६०३ कोटी रुपयांचा निधी मंजूर असूनही आजही गडावर समाधानकारक काम दिसत नसून अपेक्षित कामे पूर्ण झालेली नसल्याचा आरोप शिवरायांच्या सैन्यातील पायदळप्रमुख सरनोबत पिलाजी गोळे यांचे वंशज लौकिक गोळे व ॲड. अर्चना मारणे यांनी आज येथे पत्रकार परिषदेत केला. रायगड विकास प्राधिकरण तात्काळ बरखास्त करण्याची मागणी यावेळी रायगड बचाव समितीच्या वतीने करण्यात आली. याबाबत सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी गेल्या रविवारी (२४ मे) 'रायगड वाचवा' अभियानांतर्गत पुण्यात भव्य दुचाकी फेरीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी संताप व्यक्त करतांना गोळे म्हणाले की, शिवभक्त, इतिहासप्रेमी, सरदार घराण्यातील काही वंशज आणि स्थानिक नागरिकांकडून या भ्रष्ट कारभाराबाबत सातत्याने आवाज उठविण्यात येत असूनही रायगड विकास प्राधिकरण याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. आज रायगडावर निकृष्ट कामे, भ्रष्टाचार, निधीचा अपव्यय, निष्काळजी प्रशासन आणि पर्यटकांच्या सुरक्षेकडे होत असलेले दुर्लक्ष यामुळे संतापाची लाट निर्माण झाली आहे. पर्यटकांसाठी उभारण्यात आलेली स्वच्छतागृहे तीन वर्षांपूर्वी बांधण्यात आली होती, मात्र ती कधीच सुरू करण्यात आलेली नाहीत. आज ती मोडकळीस आलेल्या अवस्थेत असून पुन्हा त्याच कामासाठी नव्याने निधी खर्च केला जात आहे. एकच काम दोन वेळा का करण्यात आले? असा सवाल रायगड विकास समितीने वारंवार उपस्थित केला आहे. गडावरील पाणी, स्वच्छतागृहे, कचरा व्यवस्थापन आणि मूलभूत



सुविधांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. सुमारे १५ लाख रुपये खर्च करून बसवण्यात आलेले पिण्याच्या पाण्याचे फिल्टर अवघ्या एका महिन्यात बंद पडले असून आज त्यांची अवस्था भंगार स्थितीत झालेली आहे. तज्ज्ञांच्या चुकीच्या निर्णयांमुळे शासनाचे सुमारे ३५ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. रायगडावरील टकमक टोक येथील लोखंडी सुरक्षा जाळ्या (रेलिंग) गंजलेल्या आणि तुटलेल्या अवस्थेत असल्याने पर्यटकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. नव्याने बांधलेल्या पायरीमार्गालगतची संरक्षण भिंतही धोकादायक झाली आहे. यामुळे दुर्दैवाने दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी रायगड विकास प्राधिकरण घेणार का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. रायगड घेऱ्यातील २१ गावांमधील ऐतिहासिक वास्तू व वस्तूंचे जतन, वाघबिळ / नाचण टेप परिसरातील अश्मयुगीन अवशेषांचे संवर्धन, वणव्यांवर नियंत्रण आणि युनेस्कोच्या नियमांनुसार जागतिक वारसा प्रक्रियेला बाधा पोहोचणार नाही यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात येत आहे. गडावरील काही ऐतिहासिक वास्तू नष्ट करण्यात आल्या आहेत. चुन्याचा घाणा, शिवकालीन दगडी जाळी यांसारख्या प्राचीन वास्तूंचे नुकसान झालेले असून, शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ऐतिहासिक पायऱ्या जतन करण्याऐवजी मातीखाली गाडण्यात आल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

